शतकाची परंपरा
Haffkine
मानव सेवेत समर्पित

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्या.)
महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम

सप्टेंबर, २०२१   अंक १४वा

# हाफकिन वृत्त

मानव सेवेत समर्पित



## माननीय मुख्यमंत्री महोदयांची हाफकिन महामंडळास भेट



डावीकडून मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे,
मुख्यमंत्री मा. ना. श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे,
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड,
महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव श्री. सौरभ विजय
आणि मागील बाजूस  मौखिक पोलिओ लस उत्पादन प्रकल्पातील अधिकारी

# विशेष आभार



**मा.ना.श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. ना. श्री. अजित पवार**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. डॉ. राजेंद्र शिंगणे**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन,
महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री. राजेंद्र श्यामगोंडा पाटील (यड्रावकर)**
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण,
वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन,
वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य



**मा. श्री. सौरभ विजय (भा.प्र.से.)**
सचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय



**मा. डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.)**
व्यवस्थापकीय संचालक
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्या.)

# व्यवस्थापकीय संचालक यांचे मनोगत



भारतीय जनतेला वाजवी दरामध्ये चांगल्या गुणवत्तेची जीवरक्षक औषधे मिळावी या हेतूने महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने यावर्षी १ सप्टेंबर रोजी ४७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. आणि सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे महामंडळाची यशस्वी घोडदौड चालू आहे. या वाटचालीचे साक्षीदार असलेल्या हाफकिन महामंडळाच्या परळ, पिंपरी आणि जळगाव विभागांतील सर्व कार्यरत अधिकारी आणि कर्मचारी तसेच माजी अधिकारी आणि कर्मचारी यांना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!!

माननीय मुख्यमंत्री महोदय यांनी हाफकिन महामंडळाला माहे मार्च २०२१ रोजी भेट दिली आणि कोव्हॅक्सिन लसीचे उत्पादन करण्यास मान्यता व अर्थसहाय्य मंजूर केले आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो. कोव्हॅक्सिन लसीचे उत्पादन करणे ही बाब हाफकिन महामंडळाच्या इतिहासामध्ये ऐतिहासिक क्षण (हिस्टॉरिकल माईल्स्टोन) ठरणार आहे. कोव्हॅक्सिन लसीचे उत्पादन प्रकल्पाकरिता सर्वप्रथम आपण 'बायो सेफ्टी लॅब ३' मुंबई विभागामध्ये बांधणार आहोत. 'टर्न की' तत्वावर 'बायो सेफ्टी लॅब ३' बांधून, लवकरात लवकर कोव्हॅक्सिन लसीचे उत्पादन करुन त्याचा पुरवठा शासनाला करण्याचे आपले ध्येय आहे. महत्वाचे म्हणजे कमीत कमी वेळेत आपल्याला हे ध्येय पूर्णत्वास न्यायचे आहे. आणि आपण सर्वजण मिळून हे ध्येय नक्कीच पूर्ण करु याची मला खात्री आहे.

स्वामी विवेकानंद यांचे प्रोत्साहनपर दोन विचार येथे मी आवर्जून नमूद करु इच्छितो-

Devotion to duty is the highest form of worship of god

कर्तव्याची निष्ठा हे देवाच्या उपासनेचे सर्वोच्च स्वरुप आहे.

Arise, Awake & Stop not till the goal is reached

उठा, जागा आणि तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत आपले ध्येय साध्य होत नाही.

हाफकिन महामडळातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी या विचारांचे अनुकरण करावे व 'एकमेकां सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ' या उक्तीप्रमाणे कार्य करावे असा मोलाचा संदेश मी या हाफकिन वृत मुखपत्राच्या माध्यमातून देऊ इच्छितो.

हाफकिन महांडळाच्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छांसह!!

**डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्या.)**

# संपादकीय

**हा**फकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या ४७ व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!!

'मानव सेवेत समर्पित' हे ब्रीद वाक्य घेवून १९७५ साली हाफकिन महामंडळाचा जन्म झाला. देशातील गोरगरीब जनतेची सेवा करुन अनेक वेळा हे ब्रीद वाक्य महामंडळाने सार्थक केले आहे.

करोनाच्या पहिल्या लाटेला आणि त्यानंतर आलेल्या दुस-या लाटेचा काळ हा फार आव्हानात्मक, खडतर आणि वेदनादायी होता. या काळात देखील हाफकिन महामंडळाने 'मानव सेवेत समर्पित' या ब्रीदवाक्याप्रमाणे जीवरक्षक औषधांचे उत्पादन करुन त्याचा पुरवठा शासनाला केला आहे. या करोना महामारीच्या वाईट काळात घडलेली एक चांगली बातमी म्हणजे करोना लसीचे उत्पादन करण्याकरिता हाफकिन महामंडळाला शासनाकडून मिळालेली परवानगी आणि आर्थिक मदत होय. हाफकिन महामंडळाकडे लस बनविण्याचा पूर्वानुभव आहे. बौध्दिक संपदा आहे. तसेच शास्त्रज्ञ व कुशल मनुष्यबळ देखील आहे. त्यामुळे करोनाची लस आपण लवकरात लवकर उत्पादित करुन शासनाला देवू शकू हा आत्मविश्वास देखील आहे. माननीय व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर करोना लसीचा प्रकल्प आपण लवकरात लवकर पूर्ण करु यात तिळमात्र देखील शंका नाही. हा प्रकल्प पूर्ण करताना आपल्यावर अनेक जबाबदा-या आहेत त्यापैकी एक महत्वपूर्ण जबाबदारी म्हणजे सायबर सुरक्षित राहण्याची.

इंटरपोल या आंतरराष्ट्रीय इंटर गर्व्हमेंट आर्गनायझेशनने करोना लॉकडाउनच्या काळात करोना संबंधी उपचार करणारे, लसीचे उत्पादन करणारे, माहिती ठेवणा-या संस्थांना, उत्पादक कंपन्यांना, शासकीय आस्थापना व संस्थांना सायबर हॅकर्सपासून सतर्क राहण्याचा इशारा जारी केलेला आहे.

'सायफर्मा' या सायबर गुप्तचर कंपनीने मार्च २०२१ मध्ये भारतातील करोना लस उत्पादन करणा-या सिरम संस्था आणि भारत बायोटेक या कंपन्यांच्या सर्व्हरवर 'एपीटी १०' तसेच 'स्टोन पांडा' या नावाने ओळखल्या जाणा-या चीनमधील हॅकींग गटाने हल्ला केल्याबाबतची माहिती प्रसिध्द केली आहे. या हल्ल्यामागील मुख्य हेतू हा या दोन कंपन्यांचे माहिती तंत्रज्ञान जाळे आणि पुरवठा साखळी सॉफ्टवेअर हॅक करणे तसेच बौध्दिक संपदा हिरावणे आणि भारतीय औषध निर्माण कंपन्यांवर स्पर्धात्मक फायदा मिळविणे हा होता.

१२ ऑक्टोबर २०२० रोजी चीन येथील 'रेडएको' गटाच्या हॅकर्सनी संगणकीय विषाणूद्वारे (मालवेअर) मुंबईतील एमएसईबी च्या पॉवर ग्रीड सिस्टीमवर हल्ला करुन मुंबईतील संपूर्ण वीज पूरवठा खंडीत केला असा दावा अमेरिकेतील रेकॉर्डेड फ्युचर कंपनीने केला असून त्यासंबंधी सविस्तर वृत्त न्यूयार्क टाईम्सने प्रसिध्द केले होते.

हाफकिन महामंडळामध्ये आता कोव्हॅक्सिन लसीचे उत्पादन सुरु होत आहे. त्यामुळे महामंडळातील सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी सायबर सुरक्षित राहणे अत्यंत आवश्यक आहे. भारत देश हा देखील इंटरपोलचा सदस्य आहे. इंटरपोलने करोना काळात सायबर सुरक्षित कसे रहावे याकरिता 'सायबर स्वच्छतेच्या सात सुत्री' सूचना दिल्या आहेत. या सात सुत्रींचे पालन केल्यास आपण स्वतः व पर्यायाने आपले महामंडळही सायबर सुरक्षित राहू शकते.

१) स्वतःचा डेटा, माहिती वेगळी ठेवा; ती कुणाशीही शेअर करु नका.
२) आपले खाते (अकाउंट) आणि पासवर्डचे निरीक्षण करावे व स्ट्राँग पासवर्ड ठेवा.
३) अज्ञात प्रेषक (सेंडर्स पासून) सोशल डिस्टंन्सींग पाळा. म्हणजे अज्ञात व्यक्तीशी मैत्री करु नका किंवा त्याने पाठविलेला मॅसेज, लिंक्स्, ई-मेल ओपन करु नका.
४) ॲण्टी व्हायरस सारखी संरक्षक उपकरणे आपल्या लॅपटॉप, संगणक, मोबाईलमध्ये वापरा. कोणतेही फ्री, डेमो, पायरेटेड आवृत्ती वापरु नका.
५) संशयास्पद ई-मेल व त्याला संलग्न असलेली फाईल पासून संपर्क टाळा. म्हणजे कोणतीही संशयास्पद ई-मेल, मॅसेज, लिंक्स् ओपन करु नका.
६) स्वच्छ संगणक प्रणाली आणि मोबाईल उपकरणे वापरा म्हणजे आपल्या संगणकात व मोबाईलमध्ये कोठल्याही प्रकारचा वायरस, मालवेअर व बनावट ॲप्स् नसल्याबाबतची खात्री करा.
७) इंटरपोलच्या #WashYourCyberHands या प्रोजेक्टमध्ये सहभागी व्हा ज्यामध्ये

- #WashYourCyberHands of Ramsomware रॅनसमवेअर व्हायरस पासून सतर्क रहा.
- #WashYourCyberHands of fake website फेक, बनावट संकेतस्थळांपासून सावध रहा.
- #WashYourCyberHands of spam स्पॅम ई-मेल, मॅसेज पासून सावध रहा.
- #WashYourCyberHands of unknown senders अज्ञात प्रेक्षकाने पाठविलेल्या ई-मेल, मॅसेज, लिंक्स् पासून सावध रहा.
- #WashYourCyberHands of malware मालवेअर व्हायरस पासून सतर्क रहा.

'हाफकिन वृत्ताच्या' या अंकाच्या माध्यमातून वाचकांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे हा प्रमुख हेतू आहे.

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी महामंडळाला दिलेली भेट, करोना काळात हाफकिन महामंडळाने केलेले विशेष कार्य, महामंडळाच्या दोन कामगारांना मिळालेला गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार इत्यादी अनेक बाबी या मुखपत्रात नमूद केलेल्या आहेत. हा अंक वाचकांना नक्कीच आवडेल, संग्राहय ठरेल ही खात्री आहे. वाचकांच्या प्रतिक्रिया व सूचना स्वागतार्ह.

**श्री. अमित आ. डोंगरे**
प्रबंध संपादक - हाफकिन वृत्त

**संपादकीय मंडळ :**

**श्री. अमित आ. डोंगरे**
कामगार कल्याण अधिकारी, जनसंपर्क अधिकारी
प्रबंध संपादक - हाफकिन वृत्त.

**श्री. किरण रा. जाधव**
कार्यकारी संपादक
तथा वितरक

**श्री. दिनेश ना. जगताप**
वितरक

**श्री. नितिन भा. भवर**
सहाय्य

संपर्क : www.vaccinehaffkine.com ❖ : lwo@vaccinehaffkine.com ❖ ०२२ २४१२९३२०/२२ (वि.२५५)

❖ १ सप्टेंबर २०२० ते १ सप्टेंबर २०२१ या कालावधीमधील घडामोडींची माहिती या मुखपत्रामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.
❖ या मुखपत्रातील सर्व सुविचार संग्रहीत आहेत.



रिझर्व बँक सांगते आहे...........
सायबर सुरक्षेविषयी जाणकार बना सतर्क रहा!




'भारतातील कॉलरा लसीकरण - कलकत्ता, १८९५' या डॉ. वाल्देमार मोर्देकाय हाफकिन यांच्या लेखामधील उतारा - ''जेव्हा ही मोहिम मी हाती घेतली तेव्हा मला ढोबळ कल्पना देखील नव्हती की, कोणत्या अडचणी माझ्यासमोर येतील, हे ही माहिती नव्हते की मी त्यांचा सामना करायला तयार असेन''.

डॉ. हाफकिन यांनी स्वतःच्या शरीरावर लसीची चाचणी करून लसीची परिणामकारकता सिध्द केली होती.

**फोटो:-** बंगाल प्रांतातील कॉलरा संसर्गित प्रदेशामध्ये डॉ. हाफकिन परीक्षण करताना

**स्त्रोत:-** डॉ. हाफकिन यांचे संग्रहण इस्त्राईल नॅशनल लायब्ररी



"I don't like persons demonstrating their feelings to everybody. I prefer individuals with quiet, equal or even cold face while a huge internal work of intellect and heart is raging within him."

(From Dr. Haffkine's notebook)



सन १९०५ चे 'शरीरशास्त्र आणि औषध' या विषयातील नोबेल पारितोषिक विजेते डॉ. रॉबर्ट कोच यांची दमण गुजरात येथे डॉ. वाल्देमार मोर्देकाय हाफकिन यांच्याशी झालेली भेट. (सन १८९७)

**स्त्रोत :-** डॉ. हाफकिन यांचे संग्रहण इस्त्राईल नॅशनल लायब्ररी



डॉ. हाफकिन यांनी मायक्रोबॉयोलॉजी या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांच्याकरिता प्रसिध्द ज्वेलर श्री. फेबेर्ज यांनी प्लेग जिवाणूचा फोटो असलेले सोन्याचे अव्दितीय कफलिंक्स् तयार करून त्यांना भेट दिले. १८९४ साली प्लेगच्या जीवाणूचा शोध लागला आणि लगेच दोन वर्षानंतर डॉ. वाल्देमार मोर्देकाय हाफकिन यांनी प्लेगच्या लसीचा शोध लावला.

**स्त्रोत :-** सायन्स म्युझियम लंडन

अनोळखी स्त्रोतामधून आलेले कोणतेही ॲप इन्स्टॉल केल्यामुळे घोटाळेबाजांना तुमच्या मोबाईल फोनमध्ये सहजपणे शिरकाव करता येऊ शकतो.

# मानननीय मुख्यमंत्री महोदयांची हाफकिन महामंडळास भेट

**"कोविडचा संसर्ग महाराष्ट्रात थांबविण्यासाठी कोविड लसीकरणावर भर देण्याकरिता कोविड लसीचे उत्पादन हाफकिन महामंडळामार्फत करण्यात येणार"**

**.. माननीय मुख्यमंत्री श्री.उध्दव ठाकरे**





महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी दि. २० मार्च २०२१ रोजी परळ मुंबई येथील हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आणि हाफकिन संस्थेला सदिच्छा भेट दिली. यावेळी मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला मुख्य सचिव श्री. सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव श्री. आशिष कुमार सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, वन विभागाचे प्रधान सचिव श्री. मिलिंद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. आबासाहेब जऱ्हाड, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव श्री. सौरभ विजय, हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड, महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कोविडला प्रतिबंध घालण्यासाठी राज्य शासन सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. गेल्या वर्षीप्रमाणे आता देखील संसर्गाला रोखण्यासाठी अतिशय काटेकोरपणे पाऊले उचलण्यात येत असून येत्या काही दिवसांत महाराष्ट्रातील कोविड लसीकरण करण्यावर भर देण्यात येत आहे. येणा-या काळात हाफकिन संस्थेचे स्वत:चे असे 'जैव वैद्यकिय संशोधन केंद्र' स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाची मदत घ्यावी असे माननीय मुख्यमंत्री यांनी निर्देश दिले.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कोविड लसीचे उत्पादन करण्यात येणार असून त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन प्लांट मुंबईत सुरु करण्यात येत आहे. देशातील काही राज्यांतील वाढत्या कोविड संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी अधिकाधिक लसीकरण केंद्रांना परवानगी मिळावी, लसीकरणाचा वेग वाढवता यावा याकरिता हाफकिनला लस उत्पादन करण्याची मान्यता मिळणे आवश्यक आहे असे सांगितले. तसेच यासाठी केंद्र शासनाकडे याबाबत तातडीने पाठपुरावा करण्यात यावा. उत्कृष्ट दर्जाच्या लस निर्मिती व पुरवठा करण्यावर भर देताना येणा-या काळात हाफकिनने औषध निर्माण करण्याबरोबरच कोविड लस निर्मितीसाठी आयसीएमआर/भारत बायोटेक लिमिटेडकडून कोविड लसीचे तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे असे आदेश दिले.

कोविड लसीचे हाफकिनकडून उत्पादन करण्याबाबत मुख्यमंत्री म्हणाले, हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ यांना मिशन कोविड सुरक्षेअंतर्गत लसीची टेक्नॉलॉजी हस्तांतरण करण्यासाठी आयसीएमआरच्या मार्गदर्शनाने परवानगी मिळाल्यास लस प्रत्यक्ष उत्पादित करता येईल किंवा फील-फिनिश बेसिसवर हाफकिनला काम करता येईल. यामधून १२६ लाख कोविड लसी हाफकिनमार्फत उत्पादित होऊ शकतात असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



सायबर फसवणूक चुटकीसरशी होऊ शकते. तुमचे कार्ड, बँक अकाऊंट, आधार कार्ड, पॅनकार्ड यांचा वैयक्तिक तपशिल कुणाहीसोबत कधीही शेअर करु नका.

# माननीय मुख्यमंत्री महोदयांची हाफकिन महामंडळास भेट





कोविड लसीच्या लवकर उपलब्धतेसाठी हाफकिन महामंडळाच्या परळ आणि पिंपरी येथे उत्पादन सुविधा उपलब्ध असल्याने येथील उपलब्धता लक्षात घेऊन यादृष्टीने काम सुरू करण्यात यावेत. हाफकिन महामंडळाच्या पोलिओ लस उत्पादन सुविधेची असलेली वार्षिक उत्पादन क्षमतेबरोबरच कोविड लसींचा निर्मिती आणि पुरवठाही वाढविण्यात यावा. परळ येथील हाफकिन संस्थेत कालमर्यादेत प्रयोगशाळा उभारण्यासाठी उपलब्ध असणारी जमीन, लस तयार करण्यासाठी आवश्यक असणार खर्च, मनुष्यबळाची तरतूद या सगळया बाबी तपासून घ्याव्यात, हाफकिनमार्फत वर्ष २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत अंदाजे १३० कोटी लस निर्माण करण्याची क्षमता आहे. सध्या भारत बायोटेकशिवाय इतर लस तयार करणा-या उत्पादकांबरोबरही प्राथमिक बोलणी करण्यात यावी असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगीतले.

पहिल्या टप्प्यात भारत बायोटेक यांच्याकडील लस ठोक स्वरूपात घेण्यात येणार असून ती हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळामार्फत रिपॅकिंग व फिलिंग करून आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येईल. सध्या या लसीचे उत्पादन भारत बायोटेक आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांच्यामार्फत संयुक्तपणे केले जाते. कोवॅक्सिन या नावाने ही लस सध्या बाजारात आणली आहे. हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळामार्फत कोविड लसीची गरज असेल तोपर्यंत हे उत्पादन सुरु ठेवण्यात येईल आणि त्यानंतर या प्लांटमधून श्वान दंशावरील लस विकसित करून या लसीचे उत्पादन करण्यात येईल. किंवा वेळोवेळी लागणा-या अन्य लसींच्या उत्पादनासाठी या प्लांटचा उपयोग करण्यात येईल. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी हाफकिन संस्थेच्या संग्रहालयाला आणि हाफकिन महामंडळाच्या मौखिक पोलिओ लस उत्पादन प्रकल्पाला भेट दिली.

माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीमुळे हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे, आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले त्यामुळे कोवॅक्सीन लसीच्या उत्पादन निर्मिती करीता प्रेरणा मिळाली आहे.








## मा.ना.श्री.डॉ. राजेंद्र शिंगणे

### अन्न व औषध प्रशासन मंत्री यांची हाफकिन महामंडळाला भेट



**को**वॅक्सिन लसीचे उत्पादन प्रकल्प बांधणीच्या कामकाजाविषयी पाहणी करणेकरिता महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री मा.ना.श्री. डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिनांक ०८/०६/२०२१ रोजी मुंबई येथील हाफकिन महामंडळाला आणि हाफकिन संस्थेला सदिच्छा भेट दिली.







## मा. ना. श्री. अमित देशमुख

### वैद्यकिय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री यांची हाफकिन महामंडळाला भेट

**म**हाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री मा.ना.श्री. अमित देशमुख यांनी दिनांक ०४/११/२०२० आणि ०४/१२/२०२० रोजी मुंबई येथील हाफकिन महामंडळाला आणि हाफकिन संस्थेला सदिच्छा भेट दिली. कोविड-१९ प्रादुर्भावात वैदयकिय साहित्य आणि साधने स्विकारून त्यांचे शासकीय दवाखाने आणि वैद्यकिय महाविदयालयांना वितरण केल्याबददल मंत्री महोदयांनी हाफकिन महामंडळाची प्रशंसा केली.

वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाचे सचिव श्री. सौरभ विजय (भा.प्र.से.), हाफकिन संस्थेच्या प्रभारी संचालिका श्रीमती. सीमा व्यास (भा.प्र.से.), हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.), महाव्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरवार, हाफकिन खरेदी कक्षाचे तत्कालीन महाव्यवस्थापक डॉ. कुंभार, हाफकिन संस्थेचे सहाय्यक संचालक डॉ. शशिकांत वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.










अनोळखी व्यक्तीने पाठविलेला कोणताही QR कोड स्कॅन करु नका.

# कोविड-१९च्या संदर्भात अत्यावश्यक सेवेतील हाफकिन महामंडळाचे विशेष कार्य




**क**रोना लॉकडाऊनच्या काळात देखील देशाला आणि राज्याला जीवनावश्यक औषधांचा पुरवठा व्हावा या हेतूने उत्पादन विभाग कार्यरत ठेवण्यात आला होता.

वर्ष २०२०-२१ मध्ये परळ विभागामार्फत १७,८५,८०,००० मौखिक पोलिओ लसीच्या डोसेसचे उत्पादन करून त्याचा पुरवठा भारत सरकारला करण्यात आला.




महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभागाने वर्ष २०२०-२१ मध्ये सर्प दंश प्रतिविषाच्या २,६६,६७५ कुप्या आणि विंचूदंश प्रतिविषाच्या ८००० कुप्या उत्पादित करून त्याचा पुरवठा राज्य शासनाला केला.




हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड जळगाव विभागाने वर्ष २०२०-२१ या कालावधी दरम्यान ऍमाक्सीसीलीन कॅप्सूल्सचे १,२७,००,०१३ कॅप्सूल्स् आणि ५,७३,७५० ऍम्पीसिलीन ओरल सस्पेंशन बॉटल्सचे उत्पादन करून त्याचा पुरवठा राज्य शासनाला केला.

लॉक डाऊन सारख्या कठीण परिस्थितीत कामावर येऊन शासनाला जीवनावश्यक औषधांचा पुरवठा करणारे कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन आणि निस्सीम भावनेने आपण करित असलेल्या मानव सेवेतील कार्यास सलाम !!

## 'एक विचार ! एक समाज !'

या सामाजिक संस्थेने **हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने** कोविड १९ लॉकडाऊनमध्ये केलेल्या उल्लेखणीय कार्याबद्दल महामंडळाला 'कोविड योध्दा' असे मानपत्र देवून महामंडळाच्या कार्याचा गौरव केला.



|| अत्त दीप भव ||

एक विचार ! एक समाज !

रूम नं. ०१, सावित्रीबाई फुले वसाहत, जेरबाई वाडिया रोड, बेस्ट कर्मचारी वसाहत शेजारी, परळ-भोईवाडा, मुंबई - ४०० ०१२.

मानपत्र

कोविड योद्धा

श्री./श्रीम./कु. हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळ
कोविड-१९ CSR अंतर्गत मदत स्वीकृती कार्यालय

कोविड-१९ या विश्वव्यापी संकटावर मात करण्यासाठी सारे जण शर्थीचे प्रयत्न करत आहे. विभागात वैद्यकिय सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसताना स्वत:चा जीव धोक्यात घालून परळ-भोईवाडा-नायगांव-शिवडी आणि आसपासच्या परिसरातील भयग्रस्त नागरिकांचे मनोबल वाढविण्याचे तसेच त्यांना आरोग्य/नागरी सेवा प्रदान करण्याचे अतुलनिय कार्य आपण सातत्याने करीत आहात, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

आपल्या सेवाभावी वृत्तीचा सन्मान व्हावा, या हेतूने आपणांस कोविड योद्धा म्हणून मानपत्र देऊन सन्मानीत करण्यात येत आहे.

संघटक संघटक

माझे कुटुंब ! माझी जबाबदारी !!

# हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ (मर्या.) मुंबई येथे केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने कोवॅक्सिन लस उत्पादित करण्याच्या प्रकल्पास मान्यता व अर्थसहाय्य मंजूर

**संदर्भ:- महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्रमांकः एचबीपी२०२१/प्र.क्र.५३/२१/औषधे-१ तारीख :२९ एप्रिल २०२१**

- **मा**हे मार्च २०२० पासून महाराष्ट्रासह भारतात कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भाव सुरु झाला आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोविड प्रतिबंधक लस पुरेशा प्रमाणात सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याअनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९.२.२०२१ रोजी हाफकिन महामंडळ व हाफकिन संस्था यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये हाफकिन महामंडळाला विविध लसींचे संशोधन व उत्पादनाचा पुर्वानुभव असल्याने हाफकिन महामंडळाला विविध आजारावरील लस निर्मितीस प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबत दिनांक २०.०३.२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी या दोन्ही संस्थाना भेट दिली. या भेटीच्यावेळी झालेल्या बैठकीमध्ये लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी हाफकिन महामंडळाला दिले आहेत.
- दरम्यान कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोविड प्रतिबंधक लस देशातील जनतेला पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारितील जैव तंत्रज्ञान उदयोग संशोधन सहाय्यता परिषद (BIRAC) नी माहे जानेवारी, २०२१ मध्ये देशांतर्गत कोविड-१९ लसीच्या उत्पादनास चालना देण्यासाठी व सदर लस मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्याच्या दृष्टिने स्वारस्य निविदा मागविल्या होत्या. याअनुषंगाने, हाफकिन महामंडळाने याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता. याबाबत केंद्र शासनाच्या उक्त परिषदेच्या सायंटिफिक ॲडवायजरी ग्रुप, अपेक्स कमिटी व बजेटरी कमिटी यांनी सदर प्रस्तावास हाफकिन महामंडळाचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये दूरचित्रवाणीद्वारे (व्ही.सी.द्वारे) वेळोवेळी चर्चा केली व यानुसार दिनांक १५.०४.२०२१ च्या पत्रान्वये सदर प्रकल्पासाठी मे. भारत बायोटेक लि. या कंपनीकडून कोवॅक्सिन लस उत्पादन तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करून सदर लस उत्पादित करण्याच्या हाफकिन महामंडळाच्या प्रकल्पास केंद्र शासनाकडून सहकार्य करण्यात येईल, असे कळविण्यात आले. तसेच, दिनांक २७.०४.२०२१ च्या पत्रान्वये हाफकिन महामंडळाला सदर प्रकल्प राबविण्यासाठी रुपये ६५ कोटी अर्थसहाय्य करण्यास मान्यता दिली आहे.
- यानुसार, दिनांक १६.०३.२०२१ रोजी व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्या. यांनी कार्यकारी संचालक, भारत बायोटेक लि; हैद्राबाद यांच्याशी चर्चा केली. यावेळी झालेल्या चर्चेनुसार, भारत बायोटेक लि; हैद्राबाद यांनी हाफकिन महामंडळास कोवॅक्सिन (Covaxin) लस उत्पादनासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञान देण्यास त्यांच्या दिनांक १९.०३.२०२१ च्या पत्रान्वये सहमती दर्शविली असून सदर तंत्रज्ञान हाफकिन महामंडळास प्राप्त झाल्यानंतर हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाला कॉवॅक्सिन लस उत्पादन सुरु करता येणार आहे.
- याअनुषंगाने, हाफकिन महामंडळाने त्यांच्या परळ, मुंबई येथील जागेत मे.भारत बायोटेक या कंपनीचे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कोविड-१९ या साथरोगावरील कोवॅक्सिन या लसीचे उत्पादन करण्याचा प्रकल्प उभारण्याचा आणि यासाठी रु. १५४ कोटी भांडवली खर्चाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला होता.
- हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्या; मुंबई यांनी दिनांक १२.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून महामंडळाच्या परळ, मुंबई येथिल जागेत केंद्र व राज्य शासनाचे अर्थसहाय्य आणि मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड, हैद्राबाद यांचे कोविड-१९ या साथरोगावरील कोवॅक्सिन लसीच्या उत्पादनाचे तंत्रज्ञान वापरुन सदर लसीचे उत्पादन करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.
- सदर प्रकल्प उभारण्यासाठी प्रकल्प किंमत रुपये १५४ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाने रु. ६५ कोटी इतके अर्थसहाय्य मंजूर केले असून यापैकी रुपये ५९.८३३५ कोटी इतके अनुदान भांडवली खर्चासाठी (अनावर्ती) व रुपये ५.१६६५ कोटी इतके अनुदान आवर्ती खर्चापोटी मंजूर केले आहे. त्यामुळे, प्रकल्प खर्चाच्या रुपये १५४ कोटी मधील उर्वरीत भांडवली (अनावर्ती) खर्चापोटी रुपये ९४.१६६५ कोटी रक्कमेचे अर्थसहाय्य हाफकिन महामंडळाला बीज भांडवल स्वरुपात मंजूर करण्यात आले आहे.
- सदर प्रकल्पाची उभारणी तातडीने सुरु करण्यासाठी उक्त मंजूर रुपये ९४.१६६५ कोटी इतका निधी राज्याच्या आकस्मिकता निधीतून काढण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- उपरोक्त मान्यतेस अनुसरुन सदर प्रकल्पास राज्य शासनाचे सर्वतोपरी अर्थसहाय्य (Letter of Comfort) असल्याबाबतचे पत्र केंद्र शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- केंद्र शासनाने वाटाघाटीनुसार ठरवलेल्या लसीच्या दरानुसार केंद्र शासनास आणि त्यांच्या मान्यताप्राप्त संस्थांना उत्पादित लसींचा पुरवठा करण्याबाबत सदर प्रकल्प पूर्ततेच्या अहवालामध्ये लेखी हमी देण्यास, हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने मान्यता दिली आहे.
- सदर प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी आणि प्रकल्प राबविण्यासाठी येणारा आवर्ती खर्च महामंडळाच्या उत्पादनातून भागविण्यासाठी हाफकिन महामंडळास मान्यता देण्यात आली आहे.
- सदर प्रकल्पाची 'टर्न की' तत्वावर उभारणी करून तो विहीत मुदतीत कार्यान्वित करणे आवश्यक असल्याने हाफकिन महामंडळामार्फत प्रकल्प उभारणा-या कंपनीस प्रकल्पाच्या प्रारंभिक टप्प्यात ५० टक्के अग्रीम रक्कम देण्यास व उर्वरित ५० टक्के रक्कम प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- सदर प्रकल्पासाठी कोविड-१९ लस उत्पादनाचे तंत्रज्ञान हस्तांतरण करणाऱ्या मे. भारत बायोटेक इं. लि. या कंपनीबरोबर हाफकिन महामंडळाला गोपनीयता करार आणि कायदेशीर व व्यावसायिक बाबी समाविष्ट असलेला सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- आवश्यकतेनुसार इतर कोविड-१९ लस उत्पादन करणा-या कंपन्यांबरोबर लस उत्पादनासाठी आवश्यक ते सर्व करार वरील नमूद अटींच्या अधीन राहून करण्यास हाफकिन महामंडळास मान्यता देण्यात आली आहे.
- कोविड-१९ या साथरोगावरील लसीची आवश्यकता संपल्यानंतर सदर प्रकल्पाची उत्पादन सुविधा अन्य लसींच्या उत्पादनात वापरण्यासाठी हाफकिन महामंडळाला मान्यता देण्यात आली आहे.



सायबर घोटाळयांची प्रकरणे तुम्हाला बेमालुमपणे गुंतवत असतात.
म्हणून कोणत्याही अनोळखी लिंक्सना क्लिक करू नका, सुज्ञपणे वागा.

# हाफकिन महामंडळाची कोवॅक्सिन लस तांत्रिक समिती

वैद्यकीय शिक्षण व ओषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एचबीपी २०२१/प्र.क्र.५३/२१/औषधे-१ दिनांक २९.०४.२०२१ अन्वये हाफकिन महामंडळाला COVAXIN लस निर्मितीसाठी राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. देशभर लसीकरण मोहिम राबविण्याच्या हेतूने हाफकिन महामंडळामध्ये युध्द पातळीवर लसनिर्मितीसाठी प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाशी संबंधीत आराखडा (layout), उत्पादन (Production), गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली (QMS) गुणनियंत्रण (Quality Control). अभियांत्रिकी (Engineering), भांडार (Stores), विभागांशी संबंधीत कागदपत्रे प्रचलित कार्यपध्दती (SOP), BMR, Product Summary File Validation व संबंधित कागदपत्रे, Screening, Examining, Vetting चे कामकाज खालील नमूद अधिका-यांची समिती सांभाळतील. तसेच या प्रकल्पाशी संबंधित प्रस्ताव व इतर कामकाजाचे Examining व Vetting हे खालील नमूद तांत्रिक समितीमार्फत करण्यात येईल.

| क्र. | अधिका-याचे नाव | पद | कामकाज |
|---|---|---|---|
| **संशोधन व विकास** | | | |
| १ | डॉ. प्रदिप नागलकर | व्यवस्थापक, संशोधन व विकास | Receipt of seed virus cell culture, to activate our R & D Cell Culture Facility, Tech transfer related activity. Vetting of layouts & Tech doucuments etc |
| २ | श्रीमती रश्मी शिंपी | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| ३ | श्री. आशिष पोवार | उत्पादन अधिकारी | |
| **उत्पादन** | | | |
| १ | श्रीमती सोनल सावंत | उपव्यवस्थापक, उत्पादन | Production of Covid Vaccine, Tech transfer related activity from Bharat Biotech International Limited. Vetting of layouts & Tech Documents etc. |
| २ | श्री. गणेश राणे | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| ३ | श्रीमती लिना मोहिते | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| ४ | कु. माधवी चव्हाण | उत्पादन अधिकारी | |
| **गुणनियंत्रण** | | | |
| १ | डॉ. प्रदिप नागलकर | व्यवस्थापक, गुणनियंत्रण | Quality Control Related to Covid Vaccine Tech transfer related activity. Vetting of layouts & Tech documents etc. |
| २ | श्रीमती शेरॉन रुबेन बोरकर | उपव्यवस्थापक, उत्पादन | |
| ३ | श्री. किशोर विसपुते | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| **गुणवत्ता आश्वासन** | | | |
| १ | श्रीमती विद्या सवाखंडे | प्रभारी व्यवस्थापक, गुणवत्ता आश्वासन | Documentation and Site Master File, QMS, QA Validation, Caliberation, Production Summary file, BMR, SOP, Licensing. Vetting of layouts & Tech documents etc. |
| २ | श्रीमती हेमांगी विसावे | उपव्यवस्थापक, उत्पादन | |
| ३ | श्री. उमेश साळकर | उपव्यवस्थापक, उत्पादन | |
| ४ | श्रीमती मनिषा शिंदे | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| **सामुग्री व्यवस्थापन** | | | |
| १ | श्री. बबन ढेकणे | प्रभारी व्यवस्थापक, सामुग्री व्यवस्थापन विभाग | Tender, Material Supply, Services etc. Vetting of layouts & Tech documents etc. |
| २ | श्री. प्रकाश कोळी | कक्ष अधिकारी | |
| **यंत्रपरिरक्षण विभाग** | | | |
| १ | श्री. महेश जाधव | उप-अभियंता, प्रभारी सयंत्र अभियंता | Equipment/Machinery, HVAC, Civil work, Vetting of layouts & Tech documents etc. |
| २ | श्री. प्रणय पार्लेवार | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | |
| **पणन विभाग** | | | |
| १ | श्री. प्रितेश पाटील | विक्री अधिकारी, प्रभारी व्यवस्थापक पणन | Marketing / Logistics |
| **दवाखाना विभाग** | | | |
| १ | डॉ. प्रदिप धिवर | वैद्यकिय अधिकारी | Clinical Data Analysis |
| **नियामक समिती** | | | |
| १ | श्रीमती विद्या सवाखंडे | उपव्यवस्थापक, उत्पादन | Licence, Regulatory Clearance, Vetting of layouts & Tech documents etc. |
| २ | श्रीमती हेमांगी विसावे | उपव्यवस्थापक, उत्पादन | |
| **कायदेशीर समिती** | | | |
| १ | श्री. सचिन बोरकर | उपव्यवस्थापक, उत्पादन | Confidentiality Agreement / Memorandum of understanding |

एसएमएस, ई-मेल किंवा व्हाटस्‌ॲपच्या माध्यामातून
पाठवलेल्या लिंक्समधून तुमची वैयक्तिक माहिती सायबर गुन्हेगार मिळवितात.

| | | | |
|---|---|---|---|
| **माध्यम प्रसिध्दी समिती** | | | |
| १ | श्री. अमित आ. डोंगरे | कामगार कल्याण अधिकारी / जनसंपर्क अधिकारी | Liason with Media |
| **संशोधन व विकास** | | | |
| १ | श्रीमती शेरॉन रुबेन बोरकर | उपव्यवस्थापक, उत्पादन | Receipt of seed virus, cell culture, to activate our R & D Cell Culture Facility. Tech transfer related activity. Vetting of layouts & Tech doucuments etc. |
| **यंत्रपरिरक्षण विभाग** | | | |
| १ | श्री. सुनिल डी. भुजबळ | प्रभारी उप-अभियंता (विद्युत) | Equipment/Machinery, HVAC, Civil work, Electric Work, Vetting of layouts & Tech documents etc. |

सा.प्र.विभागाचे का. आ. क्र. २२५ दिनांक ३०.०८.२०२१ अन्वये हाफकिन महामंडळातील COVAXIN लस निर्मितीसाठी खालील नमूद अधिकारी/कर्मचारी यांची तांत्रिक उपसमिती गठीत करण्यात येत आहे. सदर तांत्रिक समितीमध्ये खालील नमूद अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

| क्र. | अधिका-याचे नाव | पद | कामकाज |
|---|---|---|---|
| **उत्पादन** | | | |
| १ | श्रीमती नितल देसाई | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | Drug Substance Manufacturing activities related documentation. |
| २ | श्रीमती रुपाली सनगरे | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| ३ | श्री. प्रशांत बाफना | उत्पादन अधिकारी | |
| ४ | श्री. सचिन मुसळे | उत्पादन अधिकारी | |
| ५ | श्रीमती अदिती साळुंखे | सहायक उत्पादन अधिकारी | |
| ६ | श्रीमती विजयालक्ष्मी होटकर | सहायक उत्पादन अधिकारी | |
| **गुणनियंत्रण (जैविक)** | | | |
| १ | श्रीमती प्राची तारे | उत्पादन अधिकारी | Quality Control Testing activities & documentation |
| २ | श्रीमती सोनाली वडे | उत्पादन अधिकारी | |
| ३ | श्री. गुलाब किरवले | सहायक उत्पादन अधिकारी | |
| **गुणनियंत्रक (अजैविक)** | | | |
| १ | श्रीमती जयश्री पगारे | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | Quality Control Testing activities & documentation |
| २ | श्रीमती योगिता शेडगे | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | |
| ३ | श्रीमती जागृती पवार | उत्पादन अधिकारी | |
| ४ | श्रीमती कल्पना कदम | औषध निर्माती | |
| ५ | श्री. राजेंद्र चव्हाण | उत्पादन सहायक | |
| ६ | श्री. किरण जाधव | औषध निर्माता | |
| **गुणवत्ता आश्वासन विभाग** | | | |
| १ | श्रीमती श्रेयसी मुळये | सहायक व्यवस्थापक (उत्पादन) | Quality Assurance related activity & Documentation |
| **यंत्रपरिरक्षण विभाग** | | | |
| १ | श्री उमेश पवार | पाळी अभियंता | ETP treatment & documentation |
| **सामुग्री व्यवस्थापन विभाग** | | | |
| १ | श्रीमती छाया भंडारे | कक्ष अधिकारी | Procurement related activities |
| २ | श्री. प्रशांत तांबे | कक्ष अधिकारी | |
| ३ | श्री. प्रशांत पाटील | कार्यालय सहायक | |
| **पणन विभाग** | | | |
| १ | श्री. थॉमस मॅथ्यू | सल्लागार | All activities related to Marketing supplies, logistics, billing etc. |
| २ | श्रीमती रोहिणी राठोड | सहायक अधिक्षक | |
| ३ | श्री. नितीन कांबळे | सहायक विक्री अधिकारी | |



तुमच्या बँकेच्या URL सारख्या दिसणा-या अनधिकृत लिंक्स्वर क्लिक करणे धोकादायक असू शकते.

# Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC)

Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC) Department of Biotechnology (DBT), Government of India has granted project to Haffkine Bio-Pharmaceuticals Corp. Ltd for establishment of center of excellence for snake, venom standardization and supply for manufacturing of various antiserum products that help bring innovation excellence to Haffkine Bio-Pharmaceuticals Corp. Ltd make globally competitive.

Presently, Haffkine Bio-Pharmaceutical Corp. Ltd is engaged in manufacturing antiserum products since 1939. The organization has its own snake farm approved by forest department also have vast experience and technical staff for handling and extraction of venoms from snakes by scientific way. The venom collected and stored in scientific way results in manufacturing of quality products, which were supplied to government bodies from last four decades.

**Aim/Objective of the project:**

1. Modernization of serpentarium and testing facility for collection of snake venoms from different geographical regions and its standardization, to fulfill the demand of the venoms for testing and manufacturing of the antiserum products.
2. Modernization and mechanization of horse stables for to increase the health status of the animals improvements in purification of ASVS to yield potent Antiserum products with increased productivity by minimal utilization of animals for Asian Countries.

**Inventive Step/Innovation**

It was noted by many researchers that venom has geographical variation from region to region. The antivenin manufactured using mixture of venoms collected from all geographical regions of India will be more effective as this antivenin have ability to neutralize the toxic effect of venom from different regions. Use of affinity chromatography can increase productivity at available resources, hence reducing the utilization of animals and anaphylactic reactions to the patients. Modernization of Stables will help to maintain suitable environment for resident animals.

**National Importance/ Social Relevance of project:**

1. Haffkine Bio-Pharmaceutical Corp. Ltd. is a government regulated body having motto to serve the mankind. The organization will only effectively run the project of collection of venom from all geographical regions of India, and standardization to maintain uniformity of the venom using available resources.
2. Using affinity chromatography will help to reduce anaphylactic reaction to the snakebite victim and also reduce number of vials for treatment of snake bite case.
3. Modernization of stables will help to increase productivity by maintaining the health of animals it help to overcome the problem of declining population of the equines in India.

**Commercialization potential of project**

The supply of uniform potent venom for manufacturing of antiserum will maintain quality of antisnake venom serum product that also control the quality of products manufactured in India.

Government of India suggested minimizing the use of animals in the manufacturing of antiserums. Modernization of stables and manufacturing process up gradation using affinity chromatography will help to increase the productivity using same or reduced number of animals. Also the products become safer with increased productivity to help in mitigate the national antiserum demand.

**Potential Competitors**

1. Standardization of venom will help all manufactures to maintain the uniform quality of antisera products.
2. Presently, affinity chromatography for purification of antisera is not utilized by any of the manufacturer. Haffkine will be the first manufacturer to introduce affinity chromatography for purification of antisera on large scale production. In India presently mechanized stable were not used by any manufacturer.

**Dr. B. P. Kurhe**
Manager ATS,
Haffkine Bio-Pharmaceutical Corporation ltd.
Pimpri, Pune- 411018

# शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदी धोरणामध्ये महामंडळाच्या फार्मा विभागातील नवीन उत्पादनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उदयोग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक : बैठक२०२०/प्र.क्र.६८/उदयोग-४, दिनांक २८.१२.२०२० च्या शासन निर्णयानुसार हाफकिन महामंडळाच्या फार्मा उत्पादन प्रकल्पातील औषधांचे शासकीय विभागांनी करावयाच्या खरेदी धोरणामध्ये समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदी कार्यपध्दतीच्या धोरणातील तरतुदींचे पुनर्विलोकन करण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे.

मा. मुख्य सचिव यांनी सुधारित खरेदी धोरणाच्या परिच्छेद ५.१३ च्या अनुषंगाने हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या स्वउत्पादित औषधांच्या खरेदीसाठी आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. हाफकिन महामंडळाच्या मुंबई येथील फार्मा आणि कॅप्सूल विभागातील खालील ९ उत्पादने शासन खरेदी करणार असून त्याचा पुरवठा महाराष्ट्र राज्यातील विविध रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे यांना करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

1. Diclofenac sodium tablets (50mg)
2. Atorvastatin tablets (10 mg)
3. Acyclovir tablets (200 mg)
4. Metformin tablets (500 mg)
5. Olanzapine tablets (5 mg)
6. Ofloxacine tablets (200 mg)
7. Azithromycin tablets (250 mg)
8. Omeprazole capsules (20mg)
9. Pantoprazole tablets (40 mg)

या उत्पादनांना परिशिष्ट १६ मध्ये समाविष्ट करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. शासकीय विभागामार्फत या औषधांची खरेदी करताना खालील अटी व शर्थींचे पालन करण्यात यावे असे शासनाचे कार्यालय आदेशामध्ये नमूद केले आहे.

१) उत्पादनांचा दर व गुणवत्ता स्पर्धात्मक असावी.

२) या उत्पादनांचे दर हे नॅशनल फार्मास्युटिकल्स् प्रायसिंग ऑथोरिटी (NPPA) यांच्याशी सुसंगत असावे.

३) एकूण उत्पादन क्षमतेच्या २० ते २५ टक्के उत्पादने ही खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी हाफकिन महामंडळाला शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे.

हाफकिन महामंडळाची स्वउत्पादित औषधे शासनाने खरेदी करण्यास मान्यता दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मा. मुख्य सचिव आणि उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे आभार तसेच याकरिता अथक मेहनत घेतल्याबद्दल मा. व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.) आणि महाव्यवस्थापक (उत्पादन) श्री. सुभाष शंकरवार यांचे मनःपूर्वक आभार आणि धन्यवाद !

## आर. टी. पी. सी. आर. किट प्रकल्प

कोविड १९ महामारीने जगात थैमान घातले असताना जवळजवळ दोन वर्षे पूर्ण होतील. अद्याप यावर अचूक औषधोपचार उपलब्ध नाही. लसमात्रा घेऊन मनुष्यहानी कमी होत असून देखील तिसरी लाट, करोना विषाणूच्या नविन उत्पत्ती हे धोके आपल्या देशात व संपूर्ण जगात भीतीचे सावट राखून आहेत. यात जास्तीत जास्त लोकांच्या आर. टी. पी. सी. आर. चाचणी करून लागण असलेल्या लोकांना विलगीकरणात ठेवणे हा एक प्रात्याक्षिक पर्याय ठरतो. त्यासाठी हॉस्पिटल्स्, हेल्थ केअर युनिट्स इत्यादी येथे राज्य सरकार आर. टी. पी. सी. आर. टेस्ट किट्सचा पुरवठा करते. सरकारला शक्य तितक्या कमी दरात, चांगल्या गुणवत्तेचे किट पुरवणे हा या प्रकल्पामागील उद्देश आहे. हे किट हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ व हाफकिन संशोधन, प्रशिक्षण व चाचणी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने निर्माण केले जाईल.

या प्रकल्पाच्या प्रथम टप्प्याची पूर्वतयारी करण्यात येत असून लवकरच ती पूर्ण करण्यात येईल आणि पहिल्या टप्प्यातील आर. टी. पी. सी. आर. किटच्या टेस्ट बॅचेसचे उत्पादन करण्यात येईल. टेस्ट बॅचेसना केंद्रीय औषधे मानक नियंत्रण संस्था यांकडून मान्यता मिळाल्यानंतर किटच्या बॅचेसची निर्मिती करण्यात येईल. साधारणपणे तीस हजार ते चाळीस हजार नमुन्यांची चाचणी करता येईल इतके किट्स प्रति दिन निर्माण केले जातील. हे किट तयार करून व पॅक करून त्याचा साठा -20°C तापमानात ठेवला जाईल व पुरवठा वेळापत्रकानुसार -20°C तापमानात हॉस्पिटल / हेल्थ केअर युनिट इत्यादी पर्यंत पोहोचवला जाईल. या प्रकल्पाद्वारे शासनाच्या आस्थापनेकडून म्हणजे हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आणि हाफकिन संशोधन, प्रशिक्षण व चाचणी संस्थेकडून निर्माण करण्यात आलेल्या, योग्य गुणवत्तेच्या आर. टी. पी. सी. आर. किटचा योग्य दरात व अविरत पुरवठा करता येईल.

**श्रीमती श्रेयसी मुळये**
सहाय्यक व्यवस्थापक उत्पादन
गुणवत्ता आश्वासन विभाग



गुगलवर असणा-या सर्व कस्टमर केअर क्रमांकावर विश्वास ठेवू नका.

# म्युकॉरमायकोसीस रुग्णांच्या उपचाराकरिता हाफकिन महामंडळाने शासनाला दिला मदतीचा हात

**म्यु**कॉरमायकोसीस हा आजार वैद्यकीय शास्त्रज्ञांना पूर्वीपासून ज्ञात असून हा आजार 'ब्लॅक फंगस' किंवा 'काळी बुरशी' या नावाने ओळखला जातो. करोना विषाणूने बाधीत होऊन ब-या झालेल्या रुग्णांमध्ये 'म्युकॉरमायकोसीस' नावाचा आजार होत असल्याचे निदर्शनास आले आहे. म्युकॉरमायकोसीस हा बुरशीजन्य गंभीर आजार असून 'म्युकॉरमायकोसीस' या गटातल्या बुरशीजन्य सूक्ष्मजंतूमुळे होतो. आधीपासून मधुमेह असलेल्या करोनाबाधीत व्यक्तींना त्यांच्या आजाराच्या गांभीर्यावर मात करण्यासाठी उपचारादरम्यान स्टीरॉईडसचा वापर मोठया प्रमाणात केला गेला असेल तर अशा प्रकारच्या रुग्णांना 'म्युकॉरमायकोसीस' आजार झाल्याचे आढळून आले आहे. प्रत्येक करोनाबाधीत मधुमेही रुग्णांना हा आजार होत नाही. परंतु ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेली आहे अशा व्यक्तींना हा आजार होतो.




म्युकॉरमायकोसीसचे नाकामधून मेंदूकडे जाणारा, फुफ्फुसांमध्ये, पोटामध्ये, त्वचेवर, रक्तभिसरणातून सर्व शरीरभर पसरवणारे प्रकार आहेत. या आजाराने व्याप्त असलेल्या रुग्णांच्या नाकांच्या हाडांची सायनेसची आणि डोळयांची शस्त्रक्रिया करून अंतर्गत भागात निर्माण झालेली बुरशी साफ केली जाते.

करोनाच्या दुसऱ्या लाटेदरम्यान म्युकॉरमायकोसीसचे रुग्ण मोठया प्रमाणात वाढले हाते. त्यामुळे म्युकॉरमायकोसीस आजारावर उपचाराकरिता आवश्यक 'ॲम्फोटेरेसिन बी' या इंजेक्शनची मागणी मोठया प्रमाणात वाढली; व या इंजेक्शनचा तुटवडा जाणवू लागला होता.

महाराष्ट्रातील पालघर जिल्हयातील बोईसर तालुक्यातील तारापुर येथील 'कमला लाईफ सायन्सेस' या कंपनीकडे 'ॲम्फोटेरेसिन बी' इंजेक्शन बनविण्याचा परवाना होता. हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.) आणि महाव्यवस्थापक श्री. सुभाष शंकरवार यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती विद्या सवाखंडे, व्यवस्थापक गुणवत्ता आश्वासन, श्री उमेश साळकर, प्रभारी महाव्यवस्थापक हाफकिन अजिंठा फार्मा. लिमिटेड, श्री महेश जाधव, उप अभियंता, श्री.गणेश राणे, सहाय्यक व्यवस्थापक उत्पादन, श्री. किशोर विसपुते, सहाय्यक व्यवस्थापक उत्पादन, श्री. सचिन मुसळे, उत्पादन अधिकारी यांनी माहे मे २०२१ या महिन्यामध्ये स्वतः प्रत्यक्ष कमला लाईफ सायन्सेस कंपनीमध्ये जावून तेथे इंजेक्शनचे उत्पादन करण्याकरिता चांगल्या उत्पादन पध्दतीसाठी आवश्यक त्या यंत्रणेची तपासणी केली. सर्वप्रथम हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ आणि कमला लाइफ सायन्सेस यांच्याशी लोन लायसेन्स ॲग्रीमेंट करण्यात आले. नंतर अन्न व औषध प्रशासनाकडून कमला लाईफ सायन्सेस यांच्यामार्फत हाफकिन महामंडळाने लोन लायसेन्स पध्दतीने उत्पादन करण्याकरिता आवश्यक तो परवाना मिळविला. त्यानंतर कमला लाईफ सायन्सेस यांच्याकडून हाफकिन महामंडळातील अधिका-यांच्या उपस्थितीत 'ॲम्फोटेरेसिन बी- आयपी ५०एमजी' या इंजेक्शनचे उत्पादन करून घेण्यात आले. 'ॲम्फोटेरेसिन बी' या इंजेक्शनच्या ४०,००० कुप्या तात्काळ उत्पादीत करून त्याचा महाराष्ट्र शासनाला पुरवठा करून निकड पूर्ण करण्यात आली.

म्युकॉरमायकोसीस या अचानक उद्‌भवलेल्या गंभीर आजारावर मात करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब जनतेच्या मदतीला हाफकिन महामंडळ धावून आले. करोना महामारीच्या या गंभीर प्रसंगी हाफकिन महामंडळाने मानव सेवेत केलेल्या या कार्याला सलाम.

**श्रीमती विद्या सवाखंडे**
व्यवस्थापक गुणवत्ता आश्वासन

**कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण), अधिनियम २०१३ मधील कलम ४ अनुसार हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाची 'हाफकिन महिला अंतर्गत तक्रार निवारण समिती' ची माहिती खालीलप्रमाणे:-**

१) श्रीमती श्रेयसी मुळये, सहाय्यक व्यवस्थापक उत्पादन - अध्यक्षा
२) श्रीमती सोनल सावंत, उप व्यवस्थापक उत्पादन - सदस्य
३) श्रीमती यास्मीन शेख, पध्दती विश्लेषक - सदस्य
४) श्रीमती विनया नार्वेकर, उत्पादन सहाय्यक वर्ग 'ड'- सदस्य
५) श्रीमती सुशिला माने, उत्पादन सहाय्यक - सदस्य
६) श्री. अमित आ. डोंगरे, कामगार कल्याण अधिकारी - सदस्य सचिव
७) श्री. धनजी परमार, वरीष्ठ कार्यालय सहाय्यक - सदस्य
८) श्रीमती डॉ. अनघा सरपोतदार - अशासकीय सदस्या

आपल्याला आलेला QR कोड स्कॅन करणे म्हणजे दुसऱ्याच्या
बँक खात्यावर पैसे पाठविणे होय, ना की पैसे आपल्या बँक खात्यावर मिळविणे.



# परळ, मुंबई विभाग





**हा**फकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचा ४७ वा वर्धापन दिन १ सप्टेंबर २०२१ रोजी हाफकिन महामंडळामध्ये कोविड १९ लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करून उत्साहात साजरा करण्यात आला. व्यवस्थापकीय संचालक श्री. डॉ.संदीप राठोड (भा.प्र.से.) हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

डॉ.संदीप राठोड (भा.प्र.से.) व्यवस्थापकीय संचालक, श्री. सुभाष शंकरवार महाव्यवस्थापक (उत्पादन), श्री बबन ढेकणे, सरचिटणीस हाफकिन ऑफीसर्स असोसिएशन, श्रीमती सोनल सावंत, अध्यक्षा हाफकिन ऑफीसर्स असोसिएशन, श्रीमती विद्या सवाखंडे, प्र. व्यवस्थापक गुणवत्ता आश्वासन यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि डॉ. हाफकिन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.संदीप राठोड (भा.प्र.से.) व्यवस्थापकीय संचालक आणि श्री. सुभाष शंकरवार महाव्यवस्थापक (उत्पादन) यांनी आपल्या भाषणामध्ये महामंडळाच्या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मान्यताप्राप्त कामगार संघटना यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये कोविड १९ लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्रीसत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली.












सोशल मिडीयाच्या माध्यमातून काही सायबर गुन्हेगार हे प्रथम मैत्री करून अश्लील संभाषण करून अश्लील फोटो, व्हिडीओ तयार करून ते प्रसारित करण्याची भिती देऊन पैशांची मागणी करतात. कोणत्याही अनोळखी ईसमाशी चॅटींग, फोटो, व्हिडीओ शेअरींग करू नका.

## पिंपरी विभाग



**हा**फकिन महामंडळाच्या प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभागाने १ सप्टेंबर २०२१ रोजी डॉ. बाबासाहेब कुऱ्हे, व्यवस्थापक पिंपरी विभाग, भारतीय कामगार सेना पिंपरी विभागाचे अध्यक्ष श्री. प्रविण वाघमारे आणि सचिव श्री.राजेंद्र शितोळे आदि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि डॉ. हाफकिन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. करोना लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्रीसत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती.




## जळगाव - विभाग

**हा**फकिन अजिंठा फार्मा लिमिटेड, जळगाव विभागामध्ये १ सप्टेंबर २०२१ रोजी दीपप्रज्वलन करून आणि डॉ. हाफकिन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून हाफकिन दिन साजरा करण्यात आला.



## दीपावली सोहळा

**हा**फकिन महामंडळामध्ये दीपावली निमित्त दीपप्रज्वलन सोहळा आयोजित करण्यात आला होता. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेश देशमुख (भा.प्र.से.), महाव्यवस्थापक (उत्पादन) श्री सुभाष शंकरवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

आर्थिक वर्ष २०१९-२० करिता हाफकिन महामंडळाच्या सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना यांना दीपावलीनिमित्त उत्पादनाशी निगडित रुपये २१०००/- बोनस देण्यात आला होता.








# हाफकिन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्यावतीने पुरग्रस्तांना मदत

**हा**फकिन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्यावतीने रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील आसणपोई या पुरग्रस्त व भूस्खलन पिडीत गावातील जनतेला दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंचे कीट तयार करून मदत करण्यात आली. टुथपेस्ट, टुथब्रश, फिनेल, साबण, खोबरेल तेल, डिटर्जंट साबण, आयोडेक्स बाम, विक्सबाम, नेलकटर, कंगवा, स्क्रबर या दैनंदिन वस्तूंचे कीट तयार करून त्याचे दिनांक ११.०८.२०२१ रोजी वाटप करण्यात आले.








# गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार, २०१५

**म**हाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेले महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून वर्ष २०१५ सालचा ‘गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार’ हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातील भांडार विभागातील कर्मचारी **श्री. दिनेश नामदेव जगताप**, कार्यालय सहायक आणि **श्री. कृष्णा सुखदेव ढोकले**, तबेला क्षेत्र सहा. वर्ग ‘ड’ यांना मा. ना. श्री. दिलीप वळसे-पाटील, कामगार मंत्री आणि मा. ना. श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, राज्यमंत्री कामगार यांच्या हस्ते दि. ९/२/२०२१ रोजी प्रदान करण्यात आला. श्री. दिनेश नामदेव जगताप आणि श्री कृष्णा सुखदेव ढोकले यांचे मा. व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.) यांनी महामंडळाच्या वतीने अभिनंदन केले.









विशेष म्हणजे ‘गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार’ स्वीकारण्याकरिता श्री कृष्णा सुखदेव ढोकले हे हाफकिन महामंडळाचा पिंपरी,पुणे विभाग ते परळ,मुंबई येथे सायकलने आले. ‘मी फीट तर माझे महामंडळ फीट, माझे महामंडळ फीट तर माझा देश फीट’ असा संदेश घेवून १४० किलोमीटरचा प्रवास सायकलने करून श्री. कृष्णा सुखदेव ढोकले हे पुरस्कार स्वीकारण्याकरिता आले हाते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी स्वतः हाफकिन महामंडळामध्ये येवून श्री कृष्णा सुखदेव ढोकले यांना भारताचा तिरंगा ध्वज प्रदान करून शुभेच्छा दिल्या. श्री कृष्णा सुखदेव ढोकले यांच्या या उपक्रमाचे सर्वांनी खूप कौतुक केले.



सायबर गुन्हेगार विविध प्रकारच्या गुन्हेगारी
कार्यपध्दतीचा वापर करून सामान्य नागरिकांची फसवणूक करीत असतो.

## ५० वा राष्ट्रीय सुरक्षा मासिक अभियान

संपूर्ण देशामध्ये ४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सुरक्षा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी ४ सप्टेंबर २०२१ या ५०व्या राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सुरक्षा परीषदेच्या सहयोगाने हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाच्या मुंबई विभाग, प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग आणि हाफकिन अजिंठा फार्मा जळगाव विभागामधील कर्मचाऱ्यांमध्ये औदयोगिक सुरक्षेविषयी जनजागृती करण्यात आली.



## मान्यताप्राप्त कामगार संघटनेचे सल्लागार मा. श्री. सचिनभाऊ अहिर यांची महामंडळाला भेट



हाफकिन बायोफार्मा कार्पोरेशन एम्प्लाईज युनियन या मुंबई विभागातील मान्यताप्राप्त कामगार संघटनेचे सल्लागार मा. श्री. सचिनभाऊ अहिर यांनी हाफकिन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.) यांची भेट घेवून कामगारांच्या प्रलंबित राहिलेल्या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. सातवा वेतन आयोग, आश्वासित प्रगती योजना, करारनामा, प्रमोशन पॉलिसीमध्ये करावयाच्या आवश्यक सुधारणा इत्यादी कर्मचाऱ्यांशी संबंधीत अनेक विषयांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याबद्दल व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.), श्री. सुभाष शंकरवार, महाव्यवस्थापक उत्पादन आणि मान्यताप्राप्त कामगार संघटनेचे सल्लागार मा. श्री. सचिनभाऊ अहिर आणि इतर पदाधिकारी यांचे धन्यवाद.

## हार्दिक अभिनंदन

हाफकिन महामंडळाच्या सामुग्री विभागातील कक्ष अधिकारी या पदावर कार्यरत असलेले **श्री. प्रकाश पोपट कोळी** यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची 'औषध निरीक्षक (गट-ब)' या पदाची परीक्षा उत्तीर्ण होवून, महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाच्या सरळ सेवेअंतर्गत 'औषध निरीक्षक (गट-ब)' या पदावर नियुक्त झाल्याबद्दल श्री. प्रकाश पोपट कोळी यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!



## चित्रबोध

दि. ९ सप्टेंबर २०२१ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द कार्टूनिस्ट संदिप अधवर्यू यांनी काढलेले चित्र पाहून आपणास काय चित्रबोध होतो याबाबत किमान १० ओळींमध्ये लेखी माहिती मराठी भाषेमध्ये हाफकिन वृत्त समितीला पाठवा. अत्युत्कृष्ट असलेली माहिती आम्ही पुढील अंकामध्ये प्रसिध्द करु तसेच अत्युत्कृष्ट माहिती पाठविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांस हाफकिन वृत्त समितीकडून एक विशेष बक्षिस देण्यात येईल.

फोटो सौजन्य : टाईम्स ऑफ इंडिया



# सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षितता

आज स्मार्टफोन, इंटरनेट, सोशल मिडीया, स्मार्ट टीव्ही, स्मार्टगाडी, क्युआर कोड, ऑनलाईन बँकींग, ऑनलाईन शॉपिंग, अलेक्सा तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वापरण्यात येणारी विविध ईलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादी नवनवीन तंत्रज्ञानाचा इन्क्ल्युझिव्ह ग्रोथ झालेला आहे म्हणजे समाजातील सर्व प्रकारची लोकं या तंत्रज्ञानाचा वापर करीत असून त्यांच्या जीवनाचा  अविभाज्य भाग झालेला आहे. परंतु या तंत्रज्ञानाची पूर्णतः माहिती लोकांमध्ये नसल्यामुळे आणि सायबर सुरक्षेबाबत अनभिज्ञ राहिल्यामुळे सायबर गुन्हयाला ते सहज बळी पडतात; त्यामुळे आर्थिक फसवणूक तर होतेच शिवाय खाजगी माहिती चोरीला जाते व मानसिक त्रास सहण करावा लागतो.

सायबर गुन्हे म्हणजे काय, त्यांचे प्रकार कोणते, सायबर गुन्हे बाबत असलेले कायदे, सायबर गुन्हयाला बळी पडल्यास काय करावे, कोठे तक्रार दाखल करावी, सायबर गुन्हयाला बळी न पडण्याकरिता काय दक्षता घ्यावी आणि महत्वाचे म्हणजे या तंत्रज्ञानाच्या युगात सायबर सुरक्षित कसे रहावे याविषयी माहिती देण्याकरीता हा लेख लिहिण्याचे प्रयोजन.



## सायबर गुन्हे म्हणजे काय ?

फौजदारी गुन्हयांचे कोणत्याही स्वरुपातील उल्लंघन, ज्यामध्ये संगणकीय ज्ञानाचा वापर करुन गुन्हा केला जातो. आणि यांचा वापर करुन तपास किंवा अन्वेषण आणि खटला चालविण्याच्या कामकाजातील प्रक्रियांचा समावेश आहे या गुन्हयांच्या स्वरुपाला 'सायबर गुन्हे' असे म्हणतात. (उदा. बँक फ्रॉड, फेसबुक, व्हॉटस ॲप, ट्विटर, इंन्स्टाग्राम इ. संदर्भातील गुन्हे)

सायबर गुन्हयांची आकडेवारी पाहता सायबर गुन्हयांचे प्रमाण दरवर्षी मोठया प्रमाणात वाढत आहे. परंतु गुन्हयांचा उकल होण्याचे प्रमाण कमी आहे.

| | वर्ष २०१६ | वर्ष २०१७ | वर्ष २०१८ | वर्ष २०१९ | वर्ष २०२० | वर्ष २०२१ (२१ मे २०२१) |
|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्यातील सायबर गुन्हे | २३८० | ३६०४ | ३५११ | ४९६७ | ५४५८ | १९७२ |
| गुन्हयांचा झालेला उकल | ६४८ | १०५२ | ११५२ | ८९३ | ९८३ | ४०९ |

### सायबर गुन्हयांचे प्रकार :-



१) **क्रेडिट कार्ड फ्रॉड:-** क्रेडिट कार्ड संबंधी केवायसी डॉक्युमेंट अपडेट करण्याचे खोटे फोन कॉल, क्रेडिट कार्डची माहिती काढून शॉपिंग करणे.

२) अश्लील ई-मेल पाठविणे

३) सोशल मिडीयावर बनावट खाते तयार करून इतर लोकांची फसवणूक करणे, लोकांकडे पैशाची मागणी करणे.



४) **फिशींग :-** लोकांना फसवून त्यांची व्यक्तिगत खोटी माहिती, बँक खाते, क्रेडीट कार्डची माहिती इत्यादी काढणे किंवा चोरणे, एखादया व्यक्तीचा पासवर्ड चोरून त्याआधारे एका बँकेतून पैसे काढून बोगस खात्यात पैसे पाठवून लंपास करणे. या प्रकारच्या सायबर गुन्हयाला 'फिशींग' गुन्हा असे म्हणतात.

५) **हॅकिंग :-**संगणक, संगणक यंत्रणा, संगणक नेटबोर्ड यांचा मालक किंवा त्याची प्रभारी व्यक्ती यांच्या परवानगीशिवाय एखादी व्यक्ती संगणकामध्ये किंवा संगणकीय यंत्रणामध्ये किंवा संगणक नेटवर्कमध्ये किंवा सांधनांमध्ये प्रवेश करून माहिती चोरणे किंवा संगणक यंत्रणा वापरण्यास मज्जाव करणे याला हॅकिंग असे म्हणतात.

६) **नायजेरीयन फ्रॉड :-** काही परदेशात स्थायिक झालेल्या कंपन्या किंवा व्यक्ती एखादया व्यक्तीशी संगणकाच्या माध्यमातून ई-मेल पाठवून मोठया रक्कमेचे बक्षिस लागल्याचे सांगून किंवा महागडे गिफ्ट देण्याचा बहाणा करून किंवा परदेशी चलन हस्तांतरीत करण्यासाठी मोठया रक्कमेचे आमिष दाखवून ते मिळविण्यासाठी काही रक्कम जुजबी कामासाठी खर्च करण्यासाठी देण्यास किंवा पाठविण्यास भाग पाडून फसवणूक करतात.




७) **सायबर बुलिंग म्हणजे इंटरनेट माध्यमाद्वारे छळणे :-** एखादया व्यक्तीची बदनामी करण्याच्या उद्देशाने ई-मेल, इंन्स्टंट मेसेजिंग, चॅट रुम्स्, एसएमएस, सोशल नेटवर्कींग साईट, वेबसाईट इत्यादींच्या माध्यमातून त्या व्यक्तीला घाबरविणे, व्यक्तीची बदनामी करणे.




८) **डेटा थेप्ट :-** संगणकामधील डेटा (माहिती) चोरी करणे.

९) **सॉफ्टवेअर पायरसी :-** अवैधरित्या नक्कल किंवा अधिकृत लायसन्स शिवाय सॉफ्टवेअरचा वापर करणे.

१०) **सायबर स्टॉकिंग :-** नेटवर सातत्याने एखादयाचा पाठलाग करणे, पिच्छा पुरविणे, किंवा पाठपुरावा करीत एखादया व्यक्तीचे मानसिक स्वास्थ हरपून टाकणे.

११) **पोर्नोग्राफी :-** अश्लील छायाचित्रे, चित्रफिती, अश्लील मासिके इत्यादी इंटरनेटच्या माध्यमातून पाहणे, उतरविणे, किंवा इंटरनेटवर अश्लील स्वरुपाचे लिखाण करणे.

१२) **सेक्स्टॉर्शन :-** म्हणजे लैंगिक खंडणी, लैंगिक छळ होय. पैशाच्या



स्वतःचे फेसबुक खाते प्रोफाईल लॉक करा व वापरात नसलेले डिलीट करा.

स्वरूपात खंडणी मिळविण्यासाठी किंवा लैंगिक सुख मिळविण्यासाठी एखादया व्यक्तीची लैंगिक प्रतिमा, खाजगी माहिती सोशल मिडीयावर किंवा इंटरनेटवर प्रसारित करून त्या व्यक्तीला धमकी देवून लैंगिक छळ करणें किंवा पैशाच्या स्वरूपात खंडणी मागणे.

१३) **मॅट्रीमोनियल फ्रॉड :-** लग्न ठरविणा-या विवाहविषयक संकेतस्थळावर खोटे प्रोफाईल तयार करून लग्नाची मागणी घालणे, परदेशामध्ये कामाला आहे, किंवा सरकारी सेवेत किंवा सैन्यदलामध्ये मोठया पदावर कार्यरत असल्याचे खोटे सांगून लग्नाची मागणी घालणे व त्यानंतर संवाद सुरु करून काही काळानंतर एखादा बहाना करून पैसे घेवून फसवणूक केली जाते.




१४) **सायबर डीफमेशन :-** संगणकाच्या किंवा इंटरनेटच्या माध्यमातून एखादया व्यक्तीविषयी, संस्थेविषयी खोटी, अपमानकारक माहिती प्रसारीत करून बदनामी करणे.

१५) **बँकेतून कर्मचारी बोलतोय** असे सांगून, खोटे फोन कॉल्स् करून बँकेचे क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डचा तपशिल घेणे आणि बँकेतील पैसे लुटणे.

१६) **ई-शॉपिंग फ्रॉड :-** खोटी ई-कॉमर्स वेबसाईट तयार करून किंवा ई-कॉमर्स कंपन्यांच्या नावे खोटे मॅसेज तयार करून महागातील वस्तू स्वस्तामध्ये देण्याचे आमिष दाखवून पैसे लुटणे.



१७) **ओएलक्स् वेबसाईट फ्रॉड :-** ओएलक्स संकेतस्थळावर वस्तू खरेदी करणारा किंवा विकणारा व्यक्ती हा आर्मीमध्ये कामाला आहे असे भासवून वस्तूची खरेदी किंवा विक्री करण्यासाठी क्यू.आर. कोड स्कॅन करण्यास सांगणे व त्याद्वारे पैशाची फसवणूक करणे.

१८) **इन्शुरन्स कंपनीमधून बोलत आहे** असे सांगून खोटे कॉल करणे किंवा मेसेज करणे किंवा इन्शुरन्स बोनस जाहिर झाल्याचा बहाणा करून किंवा बंद पडलेली इन्शुरन्स पॉलिसी चालू करण्याचे सांगून बँकेची माहिती / तपशिल घेणे व बँकेतील पैसा लुटणे.

### करोना काळातील सायबर गुन्हे.

- कोरोना सबसिडी मिळाली आहे किंवा प्रधानमंत्री बेरोजगार भत्ता मिळण्यासाठी खोटया लिंक्स् मॅसेज सोशल मिडीयावर पाठवून लोकांची आर्थिक फसवणूक करणे.
- एन ९५ फेस मास्क, रेमडीसीवीर इंजेक्शन, टोसीलीझुमॅब इंजेक्शन, ऑक्सीजन सिलेंडर उपलब्ध असल्याच्या खोटया लिंक्स् मॅसेज सोशल मिडीयावर पाठवून लोकांची आर्थिक फसवणूक करणे.
- करोना लसीकरीता रजिस्ट्रेशनची खोटी लिंक्स्, संकेतस्थळ तयार करून लोकांची फसवणूक करणे.
- गुगल सर्चमध्ये एखादया कंपनीच्या, दुकानाच्या, ई-कॉमर्स कंपनीच्या कॉन्टॅक्ट नंबरमध्ये बदल करून सायबर हॅकर्स, गुन्हेगार यांचा कॉन्टॅक्ट नंबर ठेवणे. त्यामुळे खरेदी करणारे व तक्रार करणारे ग्राहक गुगलवर संबंधित कंपनीचा कॉन्टॅक्ट नंबर समजून सायबर गुन्हेगाराला फोन करतात व त्यांची आर्थिक फसवणूक होते.
- प्रॉव्हीडंट फंड ऑफिसमधून बोलतोय असे खोटे फोन कॉल्स् करणे, किंवा मॅसेज पाठविणे व प्रोव्हीडंट फंडातील रक्कम काढण्याकरिता मदत करण्याचे सांगून बँकेचा तपशिल जमा करणे व आर्थिक फसवणूक करणे.
- बँकेतून बोलतोय, सरकारी कार्यालयातून बोलतोय, एखादया कंपनीतून बोलतोय असे सांगून कंपनीची चांगली सुविधा मिळविण्याकरिता ऍनी डेस्क नावाचे स्क्रीन शेअरींग सॉफ्टवेअर इंस्टॉल करायला सांगणे आणि त्यामाध्यमातून संगणकाचा किंवा मोबाईलचा पुर्णपणे ताबा मिळवून बँकेचा तपशिल जमा करणे व त्याद्वारे आर्थिक फसवणूक करणे.
- कमी इंटरेस्ट रेटमध्ये लोन मिळत आहे किंवा कमी प्रोसेसिंगद्वारे तात्काळ लोन मिळत आहे असे फोन कॉल करणे, खोटे मॅसेज सोशल मिडीया/इंटरनेटवर प्रसारित करून आर्थिक फसवणूक करणे.
- मारुती सुझुकी कंपनीच्या गाडयांचा, महिंन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीच्या गाडयांचा सेल लागला आहे. स्वस्तामध्ये गाडया मिळत आहेत. असे खोटे मॅसेज, लिंक, जाहिरात सोशल मिडीया व इंटरनेटवर प्रसारित करून लोकांची आर्थिक फसवणूक करणे.
- ॲमेझॉन, स्नॅपडिल, बिग बझार, डी मार्ट, फ्लीप कार्ड यांच्या खोटया सेलच्या जाहिराती तयार करून सोशल मिडीयावर प्रसारित करून लोकांची आर्थिक फसवणूक करणे.

### सायबर गुन्हे घडण्याची कारणे

१) संगणकाला, मोबाईलला, ई-मेल आयडीला, सोशल मिडीया खात्याला, वाय-फायला, इंटरनेट बँकींगला कमकुवत पासवर्ड ठेवणे.

२) लोभी प्रवृत्ती

३) सायबर गुन्हे सायबर सुरक्षितता आणि नवनवीन तंत्रज्ञानाविषयी असलेले अज्ञान आणि जागरूकता नसणे.

### एखादा पासवर्ड हॅक करायला हॅकर्सला किती वेळ लागतो याविषयी माहिती आहे का?

| एकूण कॅरेक्टस | फक्त आकडे | लोअरकेस अक्षरे | अप्पर आणि लोअरकेस अक्षरे | आकडे आणि अप्पर आणि लोअरकेस अक्षरे | आकडे आणि अप्पर आणि लोअरकेस अक्षरे आणि सिम्बॉल्स |
|---|---|---|---|---|---|
| ४ | लगेच | लगेच | लगेच | लगेच | लगेच |
| ५ | लगेच | लगेच | लगेच | लगेच | लगेच |
| ६ | लगेच | लगेच | लगेच | १ सेकंद | ५ सेकंद |
| ७ | लगेच | लगेच | २५ सेकंद | १ मिनीट | ६ मिनीटे |
| ८ | लगेच | ५ सेकंद | २२ मिनीटे | १तास | ८ तास |
| ९ | लगेच | २ मिनीटे | १९तास | ३ दिवस | ३ आठवडे |
| १० | लगेच | ५८ मिनीटे | १ महिना | ७ महिना | ५ वर्षे |
| ११ | २ सेकंद | १दिवस | ५ वर्षे | ४१ वर्षे | ४०० वर्षे |

संदर्भ: कोडर्स

## सायबर सुरक्षितता आणि सावधगिरीचे उपाय

- स्ट्राँग पासवर्ड ठेवणे :- अल्फा न्युमरीक, स्पेशल कॅरेक्टर्स, स्मॉल आणि कॅपीटल लेटर्स यांचे मिश्रण असलेला किमान १० ते १२ शब्दांचा पासवर्ड ठेवणे. शक्यतो स्वतःची वैयक्तीक माहिती, जन्मदिनांक, नाव, इत्यादी शब्दांचा पासवर्ड ठेवू नये. संगणकाला, मोबाईलला, ई-मेल आयडीला, सोशल मिडीया खात्याला, वाय-फायला, इंटरनेट बँकींगला, इत्यादी ठिकाणी स्ट्राँग पासवर्ड ठेवणे.
- डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, बँकींगविषयी माहिती, ओटीपी, इत्यादीबाबत माहिती कोणाही अज्ञात व्यक्तीला सांगू नका.
- मोबाईलमध्ये, संगणकामध्ये चांगला अँण्टीव्हायरस ठेवावा. अँण्टीव्हायरसचे पेड व्हर्जन असावे. फ्री अँण्टीव्हायरस किंवा डेमो किंवा पायरेटेड अँण्टीव्हायरस ठेवू नये.
- अदयावत ऑपरेटींग सिस्टीम सॉफ्टवेअर संगणकामध्ये वापरावा, कोणतेही पायरेटेड किंवा फ्री सॉफ्टवेअर वापरु नये.
- सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेले फ्री वाय-फाय इंटरनेट कनेक्शन वापरु नये. अशा फ्री वाय-फायच्या माध्यमातून कोणतेही ऑनलाईन बँकींग व्यवहार करु नये.
- स्वतःची वैयक्तीक खाजगी माहिती, खाजगी फोटो सोशल मिडीयावर किंवा इंटरनेटवर प्रकाशित करु नये. उदा. जन्मदिनांक, मोबाईल नंबर, पत्ता, कौटुंबिक माहिती, जन्मठिकाण इत्यादी.
- शॉपींग मॉल, हॉटेल, पेट्रोल पंपावर किंवा इतर ठिकाणी स्वतःचे क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्ड हे स्वतःच्या समोरच स्वाईप करावे आणि पासवर्ड टाकताना कोणालाही दिसणार नाही याची खातरजमा करावी.
- ई-मेलवर आलेल्या कोणत्याही अज्ञात मेसेजला ओपन करु नये. तसेच त्या अज्ञात मॅसेजला अटॅच्ड असलेली कोणतीही फाईल डाऊनलोड करु नये.
- स्वतःची वैयक्तिक माहिती तसेच बँकींग माहिती ई-मेलद्वारे कोणालाही पाठवू नये.
- आपल्या घरातील लहान मुलांना इंटरनेट सुरक्षितता आणि सायबर सुरक्षितता विषयी माहिती सांगावी
- बँकेतून बोलत आहे आणि तुमचे क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड ब्लॉक झाले आहे किंवा केवायसी डॉक्युमेंट नाही आहे असे फोन कॉल आले असल्यास घाबरुन न जाता फोन कॉल बंद करावा. आणि कोणतीही माहिती देवू नये. बँकेतील कर्मचारी कधीही असे फोन कॉल करुन माहिती घेत नाहीत.
- मोबाईल सेवा पुरवठादाराच्या कंपनीमध्ये फोन आल्यास व कोणतीही वैयक्तीक बँकींग माहिती विचारल्यास ती देवू नका. तसेच कोणताही ॲप किंवा सॉफ्टवेअर डाऊनलोड करु नका.
- बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावरुनच बँकेच्या शाखेची माहिती, टोल फ्री नंबर इत्यादी शोधावे. कोणत्याही इतर सर्च इंजिनद्वारे बँकेच्या कार्यालयाची, संपर्क क्रमांकाची माहिती शोधू नये.
- ऑनलाईन बँकिंग करताना शक्यतो दोन इलेक्ट्रॉनिक डिवाईसचा वापर करावा. संगणक किंवा लॅपटॉपद्वारे ऑनलाईन बँकींग लॉग इन करावे आणि मोबाईलचा उपयोग ओटीपी मिळविण्याकरिता करावा.
- कोणताही ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड करु नये. जे आवश्यक आहेत तेच ॲप डाउनलोड करावे तसेच डाऊनलोड करण्यापूर्वी त्या ॲपचे टर्म्स ॲण्ड कण्डीशन्स वाचावे आणि जर एखादे ॲप अनावश्यक बाबींची परवानगी मागत असेल तर असे ॲप डाऊनलोड करु नये.
- रिझर्व बँकेच्या नवीन नियमानुसार एक लाख रुपयापर्यंतच्या रक्कमेची बँकेतील सुरक्षिततेची जबाबदारी ही संबंधित बँक घेते. त्यामुळे एक लाखापेक्षा अधिक रक्कम असल्यास ती सेव्हींग खात्यात न ठेवता फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवावी.
- प्रत्येक बँक अकांऊटसाठी मॅक्झीमम ट्रान्झॅक्शन लिमिट ठेवावे. जेणेकरुन जर एखादया हॅकर्सने तुमच्या बँकेचे अकाउंट जरी हॅक केले तरी मॅक्झीमम ट्रान्झॅक्शन लिमिटपेक्षा अधिक रक्कम बँकेतून तो काढू शकणार नाही.
- शक्यतो युपीआय ॲपशी (फोन पे, गुगल पे, पेटीएम, भीमपे इ.) संलग्न असलेल्या बँकेमध्ये कमी पैसे ठेवावेत. आणि जस जशी गरज लागेल तसे त्या बँकेत पैसे पाठवावेत म्हणजे जेणेकरुन जर एखादया सायबर हॅकर्सने तुमचे युपीआय ॲपचे खाते हॅक केले किंवा माहिती चोरली तरीदेखील तो तुमचे जास्त आर्थिक नुकसान करु शकणार नाही.
- नेहमी लक्षात ठेवा- बक्षिस, लॉटरी, गिफ्ट लागलेले आहे असे सांगणा-या कोणत्याही लिंकसवर, मॅसेजवर विश्वास ठेवू नका, मॅसेज उघडू नका आणि स्वतःची कोणतीही माहिती सांगू नका.
- मोफत गाणी, मुव्ही, सॉफ्टवेअर, ॲप, गेम असलेल्या मोफत गोष्टी कधीही डाऊनलोड करु नका. नेहमी पेड व्हर्जन म्हणजे पैसे देवून खरेदी केलेल्या गोष्टीचं डाऊनलोड करा.
- स्वतःची माहिती, ट्रॅव्हल प्लॅन, कधीही सोशल मिडीयावर किंवा इंटरनेटवर शेअर करु नये.
- नोकरी लागल्याचे किंवा मुलाखतीला बोलविल्याचे कॉल लेटर आल्यास त्या लेटरची संबंधित कंपनीशी संपर्क साधून शहानिशा करावी. मुलाखतीकरिता उपस्थित राहण्यासाठी किंवा जॉब मिळविण्यासाठी काही पैशाची मागणी केली असल्यास अशा कॉल लेटरवर विश्वास ठेवू नका.
- विवाह जुळविणा-या संकेतस्थळाच्या माध्यमातून लग्नाची मागणी करणाऱ्या व्यक्तीची पूर्ण तपासणी करावी. त्या व्यक्तीचे आधारकार्ड, सॅलरी स्लीप, कोठे कामाला आहे, घरामध्ये कोण कोण राहतात या सर्वांची माहिती तपासावी. शक्यतो दोन्ही पक्षांच्या कुटुंबियांनी समोरासमोर येवून लग्नाची चर्चा करावी. स्वतःची कोणतीही वैयक्तीक माहिती, संपर्क क्रमांक, पत्ता, विवाह जुळविणाऱ्या संकेतस्थळावर शेअर करु नये. विविह जुळविणाऱ्या संकेतस्थळावर भेटलेल्या व्यक्तीशी एकटे भेटायला जावू नये. त्याला कोणत्याही प्रकारची माहिती देवू नये, त्याच्याबरोबर फोटो काढू नये. तसेच त्याला कोणतीही आर्थिक मदत करु नये. सायबर गुन्हेगार हे मोठया प्रमाणात विविह जुळविणाऱ्या संकेतस्थळावर सक्रिय असतात.
- कोणत्याही अनोळखी व्यक्तीची सोशल मिडीयावर आलेली फ्रेंड रीक्वेस्ट स्विकारु नये. व अशा अनोळखी व्यक्तीबरोबर कोणतीही स्वतःची माहिती, फोटो, व्हीडीओ, शेअर करु नये.
- स्वतःचे नाव फेसबुकवर शोधावे जर स्वतःच्या नावाचे डुप्लीकेट अकाऊंट असल्याचे समजल्यास लगेच त्या अकाऊंटची माहिती फेसबुकला दयावी व तुमच्या इतर फ्रेण्डसना देखील सतर्क करावे.
- स्वतःच्या फेसबुक खात्यामधील फ्रेण्डस लिस्टमध्ये एकाच मित्राचे दोन अकाऊंट असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ त्या मित्राला संपर्क साधून सांगावे, त्याचे दुसरे डुप्लीकेट अकाऊंट डिलीट करावे. सायबर गन्हेगार हे डुप्लीकेट व खोटी अकाऊंट तयार करुन इतर लोकांना फ्रेण्ड रिक्वेस्ट पाठवितात व त्यानंतर काही दिवसांनी पैशांची मागणी, मदतीची मागणी, सोशल ऍक्टीविटी करण्याकरिता पैसे जमविण्याची मागणी करुन पैसे लुटतात.



सायबर घोटाळेबाज त्यांचा सापळा अत्यंत विचारपूर्वक लावतात,
केव्हा कोणत्याही अनोळखी स्त्रोतांमधून आलेले ॲप डाऊनलोड किंवा इन्टॉल करु नका

**सायबर गुन्हयास बळी पडल्यास काय करावे**

- सर्वप्रथम बँकेशी संपर्क साधून अकाऊंट ब्लॉक करावे. किंवा क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड ब्लॉक करावे.
- पोलिस स्टेशनमध्ये जावून सायबर क्राईम सेलमध्ये लेखी तक्रार दाखल करावी. https://cybercrime.gov.in येथे सायबर क्राईमची तक्रार ऑनलाईन पध्दतीने दाखल करावी.
- शासनाच्या १५५२६० या हेल्पलाईन नंबरवर फोन करून सायबर क्राईमविषयी तक्रार दाखल करावी
- फसवणूकीचा एसएमएस, ई-मेल, लिंक, फोन कॉल्स् आले असल्यास www.reportphishing.in या शासनाच्या सायबरवेब पोर्टलवर जावून तक्रार दाखल करावी
- जर तुमच्या राहण्याच्या ठिकाणी सायबर पोलिस स्टेशन, सायबर सेल यंत्रणा नसल्यास जिल्हा पोलिस अधिक्षक किंवा पोलिस उप आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करावी.
- सायबर क्राईमची तक्रार दाखल करताना खालील दस्तावेज सोबत जोडावेत:-

१) बँकेच्या स्टेटमेंटची प्रत सोबत जोडावी.

२) फेसबुक पोस्टविषयी तक्रार असल्यास फेसबुक पोस्टची स्क्रिन शॉट काढून त्याची प्रत जोडावी.

३) एखादया चुकीच्या संकेतस्थळाविषयी तक्रार असल्यास अशा संकेतस्थळाचा स्क्रिन शॉट काढून त्याची प्रत जोडावी.

४) ई-मेलवर काही चुकीचे, अश्लील, फसवणूकीचे खोटे मॅसेज आले असल्यास अशा ई-मेलची प्रिंट काढावी व त्याची प्रत जोडावी.

- शासनाच्या incident@cert-in.org.in या ई मेल ॲड्रेसवर तक्रार पाठवू शकता तसेच +९१ १८०० ११४९४९ या मदत क्रमांकावर तक्रार नोंदवू शकता.
- जर स्मार्टफोन चोरीला गेला असल्यास/हरविला असल्यास सर्व्हीस प्रोव्हायडरला संपर्क साधून सीम कार्ड ब्लॉक करावे. पोलिस स्टेशनमध्ये जावून एफआयआर दाखल करावी. त्यानंतर डीपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशनच्या १४४२२ या हेल्पलाईन नंबरवर कॉल करून तक्रार नोंदवावी. तसेच https://ceir.gov.in या पोर्टलवर ऑनलाईन तक्रार नोंदवावी. तक्रार नोंदविताना हरविलेल्या मोबाईलचा आयएमईआय नंबर, मोबाईल नंबर, कंपनीचे नाव, ब्रॅण्ड मॉडेल नंबर, हरविल्याचे ठिकाण, दिनांक, जिल्हा, पोलिस स्टेशन तक्रार नंबर, मोबाईल मालकाचे नाव, ई-मेल आणि सध्याचा संपर्क क्रमांक इत्यादी माहिती भरावी. डिपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशन हे सदर हरविलेला मोबाईल ब्लॅकलिस्ट करून ब्लॉक करते; जेणेकरुन इतर कोणीही व्यक्ती तो मोबाईल वापरु शकणार नाही.
- नवीन मोबाईल खरेदी केल्यानंतर किंवा सेकंड हॅण्ड मोबाईल खरेदी केल्यानंतर घ्यावयाची दक्षता :-

१) *#06# असा नंबर मोबाईलमध्ये डायल करावा आणि IMEI कोड नंबर जाणून घ्यावा

२) नंतर KYM (15 digit IMEI number) असा मॅसेज टाईप करून १४४२२ या नंबरवर सेंड करावा.

जर मोबाईलचे स्टेटस ब्लॅक लिस्टेड, डुप्लीकेट किंवा ऑलरेडी इन युझ असे येत असल्यास तो विकत घेतलेला मोबाईल वापरु नये.

**श्री. अमित आ. डोंगरे**
कामगार कल्याण अधिकारी

**हा**फकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे माननीय व्यवस्थापकीय संचालक महोदयांच्या परवानगीने परळ विभाग, प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग, आणि हाफकिन अजिंठा फार्मा लिमिटेड जळगाव विभागातील सर्व स्थायी व अस्थायी स्वरुपातील अधिकारी आणि कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सहाय्याने 'सायबर गुन्हे आणि त्याबाबत घ्यावयाची दक्षता, सायबर सुरक्षितता' या विषयावर शनिवार दिनांक १७.०७.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने सदर कार्यक्रम हा राज्यातील सर्व लाभार्थी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांकरीता आयोजित केला.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाच्या सहाय्याने सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा Youtube आणि Facebook लाईव्हच्या माध्यमातून मोफत आयोजीत करण्यात आला होता. हाफकिन महामंडळाचे कामगार कल्याण अधिकारी श्री. अमित आ. डोंगरे आणि सायबर तज्ज्ञ श्री स्वप्नेश माळी यांच्यामार्फत अधिकारी आणि कर्मचा-यांना व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे राज्यातील सर्व लाभार्थी यांना उपरोक्त नमूद विषयाबाबत ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले.




हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.) आणि महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त श्री. रविराज इळवे यांचे विशेष आभार!

भारत सरकारने २९ कामगार कायदयांचे चार लेबर कोडमध्ये एकत्रिकरण केले आहे हे चार लेबर कोड खालीलप्रमाणे आहेत.

**१) वेतन अधिनियम २०१९ (वेज कोड)**

वेतन अधिनियम २०१९ हे खालील नमूद वेतन संबंधी केंद्रीय अधिनियमांच्या तरतुदींचे एकत्रीकरण आहे.

१) किमान वेतन अधिनियम, १९४८
२) वेतन प्रदान अधिनियम, १९३६
३) बोनस प्रदान अधिनियम, १९६५
४) समान वेतन अधिनियम, १९७६

**२) औद्यागिक संबंध अधिनियम (इंडस्ट्रियल रिलेशन कोड)**

औद्योगिक संबंध अधिनियम हे खालील नमूद तीन कायदयांच्या तरतुदींचे एकत्रीकरण आहे.

१) श्रमिक संघ अधिनियम, १९२६ (ट्रेड युनियन ऍक्ट)
२) औद्योगिक रोजगार स्थायी आदेश, अधिनियम, १९४६ (इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट स्टॅंडींग ऑडर्स ऍक्ट)
३) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (इंडस्ट्रियल डिस्पूटस् ऍक्ट )

**३) व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य आणि कार्यस्थळाची स्थिती अधिनियम, २०२० (ऍक्युपेशनल सेफ्टी, हेल्थ ऍण्ड वर्कींग कंडिशन्स कोड)**

खालील नमूद १३ अधिनियमांच्या तरतूदींचे एकत्रीकरण आहे.

१) कारखाना अधिनियम, १९४८
२) खाण अधिनियम, १९५२
३) गोदी कामगार (सुरक्षितता, आरोग्य, आणि कल्याण) अधिनियम, १९८६
४) इमारत आणि अन्य बांधकाम कामगार रोजगारासाठी विनिमय आणि सेवेची स्थिती, अधिनियम १९९६
५) मळा कामगार अधिनियम, १९५१
६) कंत्राटी कामगार (विनिमय आणि निरस करणे) अधिनियम १९७०
७) आंतर-राज्य स्थलांतरीत कामगार (रोजगारासाठी विनमय आणि सेवेची स्थिती) अधिनियम, १९७९
८) श्रमिक पत्रकार आणि अन्य वर्तमानपत्र कर्मचारी (सेवाशर्ती आणि संकीर्ण उपबंध) अधिनियम , १९५८
९) श्रमिक पत्रकार (वेतन निश्चिती) अधिनियम, १९५९
१०)मोटार वाहतुक कामगार अधिनियम, १९६१
११)विक्री प्रवर्धन कर्मचारी (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६
१२)बिडी आणि सिगार कामगार (रोजगार शर्ती) अधिनियम, १९८६
१३)सिने कामगार आणि सिनेमा थिएटर कामगार अधिनियम, १९८१

**४) सामाजिक सुरक्षा अधिनियम २०२० (सोशल सिक्युरिटी कोड)**

समाजिक सुरक्षा अधिनियम हे खालील नमूद नऊ कायदयांच्या तरतूदींचे एकत्रिकरण करून तयार करण्यात आलेले आहे.

१) कर्मचा-यांचे नुकसान भरपाई अधिनियम, १९२३
२) कर्मचा-यांचे राज्य विमा अधिनियम, १९४८
३) कर्मचा-यांचा भविष्य निधी आणि संकीर्ण तरतूदी अधिनियम, १९५२
४) प्रसुती लाभ अधिनियम, १९७९
५) उपदान प्रदान अधिनियम, १९७२
६) असंघटीत कामगारांची सामाजिक सुरक्षितता अधिनियम २००८
७) सिने कामगार कल्याण निधी अधिनियम, १९८१
८) इमारत आणि अन्य बांधकाम कामगारांचा सेस अधिनियम, १९९६
९) रोजगार विनिमय (रिक्त पदांची अत्यावश्यक अधिसूचना) अधिनियम

**सोशल सिक्युरिटी कोडमधील नियमांविषयी माहिती या लेखामध्ये जाणून घेवूया.**

सामाजिक सुरक्षितता अधिनियम, २०२० मध्ये सामाजिक सुरक्षिततेची व्याख्या पुढिलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे.

''कर्मचारी, असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगार यांना आरोग्य सुश्रूषेचा लाभ घेण्याची खात्री आणि उत्पन्नाची सुरक्षितता प्रदान करण्यास, खास करून उतार वयामध्ये, बेरोजगारीमध्ये, आजारपणात, अवैधतेत, कामावर झालेल्या दुखापतीमध्ये, प्रसूतीमध्ये किंवा कमवत्या व्यक्तीला गमावल्याने अधिनियमाखाली रचण्यात आलेल्या योजना आणि त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनी देऊ करण्यात आलेल्या संरक्षणाच्या उपाययोजना''

सामाजिक सुरक्षितता अधिनियम ही खालील प्रकारच्या कामागारांना व्यापते.

१) आस्थापनेतील कर्मचारी
२) असंघटीत क्षेत्रातील कामगार
३) नैमित्तिक कामगार, रोजंदारीवरील कामगार जे कंत्राटदारामार्फत किंवा थेटपणे गुंतलेले आहेत.
४) स्वयं रोजगारीत कामगार
५) गृह निवासी कामगार
६) इमारत आणि अन्य बांधकाम कामगार
७) गिग कामगार
८) प्लॅटफॉर्म कामगार
९) लागवड कामगार
१०)कंत्राटी कामगार
११)आंतर-राज्य स्थलांतरित कामगार
१२)घरगुती कामगार

सामाजिक सुरक्षितता अधिनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आणि अधिनियमांखाली असलेल्या विविध योजनांच्या प्रशासनासाठी खालील नमूद मंडळांची स्थापना करण्याची तरतूद अधिनियम करतो.

१) कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीसाठी विश्वस्तांचे मध्यवर्ती मंडळ
२) कर्मचारी राज्य विमा महामंडळ
३) संघटीत कामगारांसाठी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ
४) राज्य असंघटीत कामगारांचे सामाजिक सुरक्षा मंडळ
५) इमारत आणि अन्य बांधकाम कामगार कल्याण मंडळ
६) कोणत्याही सामाजिक संस्थेला सामाजिक सेवा संस्था म्हणून जाहीर करण्याची अनुमती विशेष उद्देश वाहन अधिनियमांतर्गत केंद्र सरकारला देण्यात आलेली आहे.
७) कोणत्याही राज्यासाठी विश्वस्तांचे मंडळ



फेसबुकवरील प्रायव्हसी सेटींगमध्ये जाऊन आपली फ्रेण्डलिस्ट कोणाला दिसणार नाही अशी सेटींग करा.

# सध्या कार्यरत असलेले सामाजिक सुरक्षाबाबतचे कामगार कायदे आणि सोशल सिक्युरिटी कोड २०२० यांच्यामधील तुलना

| क्र. | मुद्दे | सध्या कार्यरत असलेले सामाजिक सुरक्षाबाबतचे कामगार कायदयांतील तरतुदी | नवीन लेबर कोडमधील तरतुदी |
|---|---|---|---|
| १ | नवीन सामाविष्ट केलेल्या परिभाषा (व्याख्या) (कलम २) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती. | (१)स्वयंरोजगार कामगार, (२)निश्चित मुदतीचा रोजगार, (३)एग्रीगेटर, (४)करिअर सेंटर, (५)घर आधारित कामगार, (६)असंघटित कामगार, (७) गिग कामगार आणि (८)प्लॅटफॉर्म कामगार |
| २ | आस्थापनेचे नोंदणीकरण आणि रद्दीकरण (कलम ३) | पूर्वीच्या सर्व कामगार कायद्यांतर्गत आस्थापनाची नोंदणी/ रद्द करणे आवश्यक होते. | कोणत्याही विद्यमान केंद्रीय कामगार कायद्यांतर्गत आस्थापना नोंदणीकृत असल्यास, परत सोशल सिक्युरीटी कोड २०२० अंतर्गत पुन्हा नोंदणी प्राप्त करणे आवश्यक नाही. जर एकदा नोंदणी केली असेल तर पुन्हा करणे अनिवार्य नाही |
| ३ | राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा मंडळ आणि राज्य असंघटित कामगारांचे मंडळ (कलम ९) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती. | ४२ सदस्यांचे मंडळ प्रथमच तयार करण्यात आले आहे. |
| ४ | ट्रिब्युनलकडे अपील (कलम २३) | जोपर्यंत मालकाने निधीमध्ये डिमांड ड्राफ्टच्याव्दारे त्याच्याकडून देय रकमेच्या ७५% रक्कम जमा केल्याशिवाय मालकाचे कोणतेही अपील न्यायाधिकरणाद्वारे स्वीकारले जात नाही | संबंधित सामाजिक सुरक्षा संघटनेकडे देय रकमेच्या २५% रक्कम जमा केल्याशिवाय मालकाकडून कोणतेही अपील न्यायाधिकरणाद्वारे स्वीकारले जाणार नाही |
| ५ | एक्सेसिव्ह सिकनेस लाभासाठी कारखान्याच्या मालकाची किंवा मालकीची जबाबदारी (कलम ४३) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | मालकाच्या दुर्लक्षामुळे कामाच्या ठिकाणी किंवा निवासस्थानामध्ये कार्य करणाऱ्या जागेची आरोग्य विघातक परिस्थिती असेल तर आजारपणाचा लाभ म्हणून अतिरिक्त खर्च प्रदान करणे ही मालकाची जबाबदारी असेल. |
| ६ | असंगठित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठीची योजना (कलम ४५) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे लाभ लागू होतील |
| ७ | कार्यरत पत्रकारांसाठी ग्रॅज्युइटीचा कालावधी (कलम ५३) | कार्यरत पत्रकारांसाठी ग्रॅज्युइटी देण्याची मुदत ५ वर्षे होती | कार्यरत पत्रकारांसाठी ग्रॅज्युइटी देण्याची मुदत कमी करुन (३) तीन वर्षे करण्यात आली आहे. |
| ८ | असंगठित कामगारांसाठी योजनांची करण्यात आलेली आखणी (कलम १०९) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | केंद्र सरकारकडून असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी आखलेल्या खालील योजना (१) जीवन आणि अपंगत्व संरक्षण; (२) आरोग्य आणि मातृत्व, प्रसृति लाभ; (३) (ओल्ड ऐज) म्हातारपण संरक्षण; (४) शिक्षण; आणि (५) केंद्र सरकारने निर्धारित केलेले इतर लाभ. राज्य सरकारकडून असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी आखलेल्या खालील योजना (१) प्रोविडंट फंड (२) एम्प्लायमेंट इंज्युरी लाभ; (३) गृहनिर्माण; (४) कामगारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक योजना; (५) कामगारांचे कौशल्य विकास व सुधारणा; (६) अंत्यसंस्कार सहाय्य; आणि (७) वृद्धाश्रम |

फेक फेसबुक खाते निदर्शनास आल्यास जास्तीत जास्त लोकांनी तात्काळ फेक अकाऊंट म्हणून रिपोर्ट करा.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे
हाफकिन वृत्त

# सध्या कार्यरत असलेले सामाजिक सुरक्षाबाबतचे कामगार कायदे आणि सोशल सिक्युरिटी कोड २०२० यांच्यामधील तुलना

| क्र. | मुद्दे | सध्या कार्यरत असलेले सामाजिक सुरक्षाबाबतचे कामगार कायदयांतील तरतुदी | नवीन लेबर कोडमधील तरतुदी |
|---|---|---|---|
| ९ | राज्य सरकारच्या योजनांसाठी निधी कसा येईल (कलम ११०) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | योजनांसाठी निधी हा काही अंशी राज्य सरकार देईल आणि अंशतः योगदानाद्वारे |
| १० | असंगठित कामगारांसाठी, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी मदत केन्द्र, सुविधा केन्द्र सुविधा (कलम ११२) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | असंघटित कामगार, गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी हेल्पलाइन नंबर ची सुविधा, सुविधा केंद्र इ. बाबींची उपलब्धता करणेविषयी नमूद आहे. |
| ११ | असंगठित कामगार, गिग वर्कर्स आणि प्लॅटफॉर्म कामगारांचे नोंदणीकरण (कलम ११३) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | आधार क्रमांकासह इतर कागदपत्रांची पूर्तता केल्यावर गिग कामगारांची नोंदणी करण्यात येईल. |
| १२ | गिग वर्कर्स आणि प्लॅटफॉर्म वर्कर्ससाठी योजना (कलम ११४) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | केंद्र सरकारमार्फत गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी खालील संबंधित नियम तयार करण्यात येईल<br>(१) जीवन आणि अपंगत्व संरक्षण;<br>(२) अपघात विमा;<br>(३) आरोग्य आणि मातृत्व, प्रसृति लाभ;<br>(४) (ओल्ड ऐज) म्हातारपण संरक्षण;<br>(५) कामगारांच्या मुलांसाठी पाळणाघर आणि<br>(६) केंद्र सरकारने निर्धारित केलेले इतर लाभ.<br>त्यांच्या कल्याणासाठी सामाजिक सुरक्षा निधीच्या योगदानाद्वारे निधी दिला जाईल आणि एक मंडळही स्थापन केले जाईल. |
| १३ | इन्स्पेक्टर कम फॅसिलिटेटर्स याची नियुक्ती आणि त्याचे अधिकार (कलम १२२) | आस्थापनेची तपासणी करण्यासाठी फक्त इन्स्पेक्टरची नेमणूक करण्यात आलेली आहे. | राज्य सरकार तपासणीसाठी इन्स्पेक्टर कम फॅसिलिटेटर्सची नियुक्ती करेल. या कलमान्वये कर्मचारी आणि मालकाला या संहितेतील नियमांचे पालन करण्याचा सल्ला देते. |
| १४ | मालकाकडून राहीलेल्या थकबाकीचे मूल्यांकन आणि निर्धार तपशील. (कलम १२५) | कर्मचारी भविष्य निर्वाह निधीतील (PF) ७अ कलमांतर्गत चौकशीसाठी कोणतीही मर्यादा विहित केलेली नाही | भविष्य निर्वाह निधी (PF) प्राधिकरणाद्वारे एखाद्या प्रकरणाची चौकशी ५ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर सुरु केली जाणार नाही. |
| १५ | मागील निवाडयानंतर काही प्रकरणांमध्ये वाढलेली शिक्षा (कलम १३४) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | पूर्वीच्या काही प्रकरणांमध्ये शिक्षा झालेली असेल तर त्यानंतरच्या गुन्ह्यासाठी वाढीव शिक्षा होऊ शकते |
| १६ | वैधानिक योगदान स्थगित किंवा कमी करण्यासाठीचे अधिकार (कलम १४४) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | केंद्र सरकार नैसर्गिक आपत्ती, महामारीच्या प्रसंगी मालक आणि कर्मचाऱ्यांचे कर्मचारी राज्य विमा (ESI), भविष्य निर्वाह निधीसाठीचे (PF) वैधानिक योगदान ३ महिन्यांच्या कालावधीसाठी स्थगिती किंवा कमी करू शकते. |
| १७ | लाभांचा गैरवापर (कलम १४८) | या पूर्वी वेगळ्या पद्धतीने अस्तित्वात होती | या कोड अंतर्गत जर एखादी संस्था किंवा व्यक्ती लाभांचा गैरवापर करताना आढळल्यास ती संस्था किंवा व्यक्तीला शासनाच्या इतर लाभांपासून वंचित ठेवण्यात येईल |
| १८ | प्रसूती रजेनंतर Work From Home ची तरतुद कलम ६० (५) | या पूर्वी असली कसलीच तरतूद अस्तित्वात नव्हती | प्रस्तुती रजेनंतर कर्मचारी आणि मालक या दोघांच्या संमतीने संबंधित महिला कर्मचारी ही घरुन काम करू शकते Work From Home |

संदर्भ - इंडस्ट्रीऑल ग्लोबल युनियन दक्षिण आशिया कार्यालय यांच्या 'कामगार अधिनियमांना समजावून घेताना- कामगारांसाठी ठळक वैशिष्ट्ये आणि अभिप्रेत अर्थ' या पुस्तकातून.

**संकलन:**
श्री. अमित आ. डोंगरे, कामगार कल्याण अधिकारी
कु. मयूर राजपूत, प्रशिक्षणार्थी एम.एल.एस., महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था
डॉ. वैभवी फणसेकर, प्रशिक्षणार्थी एम.एल.एस., महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था



अनोळखी व्यक्तीसोबत अश्लील संभाषण करू नका,
वैयक्तिक फोटो पाठवू नका.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे

# हाफकिन वृत्त

## सेवानिवृत्ती समारंभ

आभार

**हा**फकिन जीव-औषध निर्माण महामंडळातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे अधिकारी आणि कर्मचारी यांचा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी महामंडळ निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करते. हाफकिन महामंडळातून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी आणि कर्मचारी यांस शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, डॉ. हाफकिनचे स्मृतिचिन्ह, अनुभव प्रमाणपत्र, उपदान धनादेश, रजा रोखीकरणाचा धनादेश तसेच निवृत्त कर्मचारी यास त्याच्या आवडीची एक भेटवस्तू देवून सत्कार करण्यात येतो.

## हाफकिन महामंडळातून दिनांक १ सप्टेंबर २०२० नंतर सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी

### परळ, मुंबई विभाग



**श्रीमती सुरेखा शशांक गवंडळकर**
(उत्पादन सहायक वर्ग -अ)
सेवानिवृत्ती दि. ३०.०४.२०२१




**श्री. किशोर नारायण कोरपे**
उत्पा. सहा. वर्ग 'ड'
जावक विभाग (विक्री विभाग)
दिनांक ३१.१२.२०२०

### प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग



**श्री. सुबेरसिंग ताराचंद सौदे**
तबेलाक्षेत्र सहाय्यक वर्ग 'ब'
दिनांक ३०.११.२०२०



**श्री. मनोहर काशिराम सोलंकी**
तबेलाक्षेत्र सहाय्यक वर्ग 'ड'
दिनांक ३१.०७.२०२१

### हाफकिन अजिंठा फार्मा. लि. जळगाव विभाग



**श्री. अनिल नाथू जाधव**
प्रोसेस वर्कर
सेवानिवृत्ती दि. ३०/११/२०२०



**श्री. घनश्याम दिनकर चौधरी**
प्रोडक्शन केमिस्ट
सेवानिवृत्ती दि. ३०/०४/२०२१




**श्री. अर्जुन त्र्यंबक शेळके**
प्रोसेस वर्कर
सेवानिवृत्ती दि. ३१/०५/२०२१

अनोळखी व्यक्ती आपणास बँकेचे किंवा कंपनीचे ॲप्लीकेशन आहे असे सांगून एनी डेस्क, क्विक सपोर्ट, टिम व्हिवर, एसएमएस फॉरवर्डर सारखे ॲप्लीकेशन डाऊनलोड करण्यास सांगून आपली आर्थिक फसवणूक करु शकते.

# हाफकिन नर्सरी बालवाडी

हाफकिन महामंडळाच्या कामगार कल्याण उपक्रमांतर्गत महामंडळातील अधिकारी व कर्मचा-यांच्या पाल्यांकरिता हाफकिन बालवाडी व नर्सरी चालविण्यात येते. कोविड १९ लॉकडाऊनमुळे हाफकिन नर्सरी आणि बालवाडी ही सुविधा ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पूर्ण केलेल्या पाल्यांना बालवाडी शिक्षिकांच्या हस्ते प्रगतिपुस्तक देवून गौरविण्यात आले.

























कस्टमर केअर किंवा बँकेतून बोलत असल्याचे सांगून आपली फसवणूक केली जाऊ शकते.

सामना • मुंबई, रविवार, २१ मार्च २०२१

## 'हाफकिन'ला पुन्हा ताकद देण्याची गरज
# कोविड लसीच्या उत्पादनासाठी मुंबईत १५४ कोटी रुपयांचा प्लाण्ट
### मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची घोषणा



मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) – हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेकच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कोविड लसीचे उत्पादन करण्यात येणार आहे. त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्च करून मुंबईत नवीन प्लाण्ट सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज दिली. कोविडचा वाढता संसर्ग लक्षात घेऊन राज्यातील लसीकरणाला वेग दिला जाईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज परळ येथील हाफकिन इन्स्टिट्यूटला भेट दिली व प्रयोगशाळेची पाहणीही केली, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.

**इतर उत्पादकांशीही बोलणी**

परळ येथील हाफकिन संस्थेत प्रयोगशाळा उभारण्यासाठी जमीन, लस तयार करण्यासाठी आवश्यक असणारा खर्च, तज्ज्ञ मनुष्यबळाची उपलब्धता तपासून घ्यावी. हाफकिनमार्फत एप्रिल २०२१ ▮ पान ४

**कोरोना लसीचे उत्पादन किंवा फिल ॲण्ड फिनिशसाठी हाफकिनला वाटेल ती मदत करण्यासाठी राज्य सरकार तयार आहे. यासंदर्भात केंद्राकडे लवकरच प्रस्ताव पाठवू आणि हाफकिनला पुन्हा ताकद देऊ.**

Mumbai Edition
Mar 21, 2021 Page No. 1
Powered by : eReleGo.com

---

पुढारी • www.pudhari.com • मुंबई, रविवार, २१ मार्च २०२१ ८

# हाफकिन वर्षभरात १२ कोटी डोस बनवणार
### कोविड लसीसाठी पुढाकार घेण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**



हाफकिन महामंडळाच्या परळ आणि पिंपरी येथे उत्पादन सुविधा उपलब्ध असल्याने कोविड लसीबाबत अनुषंगिक कामे सुरु करण्यात यावीत. हाफकिनमार्फत एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत अंदाजे १२ कोटी ६० लाख लस निर्माण करण्याची क्षमता आहे. सध्या भारत बायोटेकशिवाय इतर लस तयार करणाऱ्या उत्पादकांबरोबरही प्राथमिक बोलणी करण्यात यावी, अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

हाफकिनमधील प्रयोगशाळेची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वरील सूचना केल्या. कोविड लसनिर्मितीद्वारे हाफकिन इन्स्टिट्यूट यामध्ये मोलाचा सहभाग नोंदवू शकते. येणाऱ्या काळात हाफकिन संस्थेचे स्वत:चे असे जैव वैद्यकीय संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाची मदत घ्यावी. हाफकिन संस्थेने केलेले संशोधन लस, औषध निर्मितीकरीता येणाऱ्या काळात हाफकिन महामंडळाकडे देणे आवश्यक आहे.



**मुंबई : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हाफकिनमधील प्रयोगशाळेची पाहणी केली.**

■ पहिल्या टप्प्यात भारत बायोटेक यांच्याकडील कोव्हॅक्सिन लस ठोक स्वरूपात घेण्यात येणार असून ती हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशनमार्फत रिपॅकिंग व फिलिंग करून आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशनमार्फत कोविड लसीची गरज असेल तोपर्यंत हे उत्पादन सुरु ठेवण्यात येईल. त्यानंतर या प्रकल्पामधून श्वान दंशावरील लस विकसित करुन या लसीचे उत्पादन घेण्यात येईल किंवा वेळोवेळी लागणाऱ्या अन्य लसींच्या उत्पादनासाठी या प्लांटचा उपयोग करण्यात येईल.

Mumbai Edition
Mar 21, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

---

महाराष्ट्राचा मानबिंदू लोकमत • मुंबई । रविवार २१.३.२०२१ ६

# कोरोना लस निर्मितीसाठी १५४ कोटी रुपयांचा प्रकल्प
### मुख्यमंत्र्यांची माहिती; 'हाफकिन'च्या भेटीत घेतला संस्थेचा आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्यातर्फे मुंबईत कोरोना लसीचे उत्पादन करण्यात येणार असून, त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन प्रकल्प मुंबईत सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी दिली.

मुख्यमंत्र्यांनी परळ येथील हाफकिन इन्स्टिट्यूटला भेट दिली व प्रयोगशाळेची पाहणीही केली. त्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला मुख्य सचिव सीताराम कुंटे आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, हाफकिन संस्थेचे स्वत:चे असे 'जैव वैद्यकीय संशोधन केंद्र' स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाची मदत घ्यावी. अधिकाधिक लसीकरण केंद्रांना परवानगी मिळावी. लसीकरणाचा वेग वाढवता यावा, याकरिता हाफकिनला लस उत्पादन करण्याची मान्यता मिळणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाकडे याबाबत तातडीने पाठपुरावा करण्यात यावा.

मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड, हाफकिन इन्स्टिट्यूटच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. उषा पद्मनाभन, आदी उपस्थित होते.



**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी हाफकिन इन्स्टिट्यूटला भेट दिली व प्रयोगशाळेची पाहणीही केली.**

### १३० कोटी लस निर्माण करण्याची क्षमता

हाफकिनमार्फत एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत अंदाजे १३० कोटी लस निर्माण करण्याची क्षमता आहे. सध्या भारत बायोटेकशिवाय इतर लस तयार करणाऱ्या उत्पादकांबरोबरही प्राथमिक बोलणी करण्यात यावीत, असेही ठाकरे यांनी सांगितले.

### तंत्रज्ञानाचे हस्तांतरण

उत्कृष्ट दर्जाची लसनिर्मिती व पुरवठा यावर भर देताना हाफकिनने औषध निर्माण करण्याबरोबरच कोरोना लसनिर्मितीसाठी आयसीएमआर / भारत बायोटेक लिमिटेडकडून लसीच्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करण्यासाठी प्रयत्न करावेत. परळ आणि पिंपरी येथील हाफकिनच्या केंद्रात लस उत्पादन केले जाईल, असे ते म्हणाले.

Mumbai Main
Page No. 6 Mar 21, 2021
Powered by: erelego.com

---

सकाळ • मुंबई, रविवार, २१ मार्च २०२१

# लस उत्पादनात 'हाफकिन'ने पुढाकार घ्यावा
### मुख्यमंत्री ठाकरे यांच्या सूचना

मुंबई, ता. २० : लस संशोधनाचा वारसा असणाऱ्या हाफकिन संस्थेने यापुढील काळात नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करत वेगवेगळ्या आजारांवरील लशींबाबत संशोधनावर भर द्यावा. राज्यातील परिस्थिती पाहता कोरोना लस उत्पादनामध्ये हाफकिन इन्स्टिट्यूटने पुढाकार घ्यावा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केल्या.

ठाकरे यांनी आज परळ येथील हाफकिन इन्स्टिट्यूटला भेट दिली. त्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.नितीन करीर, हाफकिन इन्स्टिट्यूटच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. उषा पद्मनाभन आदी उपस्थित होते. ठाकरे म्हणाले की, कोरोना लसनिर्मितीद्वारे हाफकिन इन्स्टिट्यूट यामध्ये मोलाचा सहभाग नोंदवू शकते. येणाऱ्या काळात हाफकिन संस्थेचे स्वत:चे 'जैव वैद्यकीय संशोधन केंद्र' स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारची मदत घ्यावी.



### १२६ लाख लशींचे उत्पादन

हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्या वतीने मुंबईत कोरोना लसीचे उत्पादन करण्यात येणार आहे. त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन उत्पादन प्रकल्प सुरु करण्याचे नियोजन आहे. आगामी काळात 'हाफकिन'ने औषध निर्माण करण्याबरोबरच कोरोना लस निर्मितीसाठी 'आयसीएमआर' व भारत बायोटेक लिमिटेडकडून तंत्रज्ञानाचे हस्तांतर लवकरात लवकर करण्यासाठी प्रयत्न करावेत,असे निर्देश देत यामधून कोरोनावरील १२६ लाख लशी हाफकिनमार्फत उत्पादित होऊ शकतात, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

Mumbai, Main
21/03/2021 Page No. 1

---

महाराष्ट्र टाइम्स • महामुंबई

# लस संशोधनाला बळ
### 'हाफकिन'ला लस निर्मितीसाठी सरकारतर्फे मदतीची ग्वाही



**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

'हाफकिन इन्स्टिट्यूटचे मुख्य काम हे विविध आजारांवरील लसनिर्मिती आणि संशोधन करणे हेच आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात येथे मोठ्या प्रमाणावर संशोधनालाच प्राधान्य देणे आवश्यक असून यासाठी आवश्यक असणारे सर्व सहकार्य राज्य सरकारमार्फत करण्यात येईल', असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली हाफकिन इन्स्टिट्यूट संदर्भात आढावा बैठक मंगळवारी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ही ग्वाही दिली.

मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले की, उत्कृष्ट दर्जाच्या आरोग्यदायी उत्पादनाची निर्मिती व पुरवठा करणे यावर भर देताना येणाऱ्या काळात हाफकिन इन्स्टिट्यूटने औषध निर्माणाबरोबरच कोविडसाठीची लस निर्मिती करण्याबरोबरच संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी आयसीएमआर आणि भारत बायोटेककडून कोविड लसीच्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करण्यासाठीही प्रयत्न करण्यात यावा. येणाऱ्या काळात हाफकिन संस्थेत अद्यावत व्हॅक्सिन रिसर्च सेंटर स्थापन करण्यासाठी राज्य सरकारचे संपूर्ण सहकार्य असेल.




**पाच प्रकल्पांसाठी सहाय्य**

मानवसेवेस समर्पित असणाऱ्या हाफकिन इन्स्टिट्यूटने संशोधन आणि जीव औषध निर्माणात योगदान दिले आहे. हाफकिन संस्था येत्या काळात नावारूपाला आणण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करत आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने हाफकिन इन्स्टिट्यूटमार्फत येत्या ५ वर्षांत ५ प्रकल्पासाठी १ हजार १०० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. हे पाच महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारचा पूर्ण पाठिंबा असून येत्या १५ दिवसांत याबाबतचा सविस्तर आराखडा तयार करण्यात यावा. या आराखड्यामध्ये नेमका कोणता प्रकल्प प्रथम हाती घेतला जाऊन त्याची आवश्यकता, तो कशा पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहे, यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीचे नियोजन तसेच राज्य शासनाकडून आवश्यक असणारा निधी याबाबत या आराखड्यामध्ये संपूर्ण तपशील असावा असे निर्देश यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

राज्याची सध्याची परिस्थिती पाहता कोविडवरील लसीसाठी हाफकिन इन्स्टिट्यूटने संशोधन लवकर करणे आवश्यक आहे आणि लस तयार करण्यात हाफकिन इन्स्टिट्यूट यशस्वी ठरल्यास ही आपल्या सर्वांसाठीच अभिमानाची बाब ठरेल असेही मुख्यमंत्री ठाकरे यावेळी म्हणाले.

या बैठकीस वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख, राज्यमंत्री राजेंद्र पाटील यड्रावकर, हाफकिन इन्स्टिट्यूटच्या संचालक सीमा व्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक सौरभ विजय, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**निधीसाठी केंद्राकडे पाठपुरावा**

हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये वेगवेगळे संशोधन होण्यासाठी वेळोवेळी निधीची आवश्यकता भासत असते. केंद्र सरकारकडून संशोधनसाठी राज्यांना निधी दिला जातो. हाफकिन इन्स्टिट्यूटला निधी मिळावा यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यासाठी एक स्वतंत्र टीम तयार केली जाईल, असे वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी यावेळी सांगितले.

---

SUNDAY FREE PRESS JOURNAL • Quality at Value
VOL. 32 NO. 46 | MUMBAI, PUNE, INDORE, BHOPAL
SUNDAY | MARCH 21, 2021 | 15 PAGES | ₹4

# Haffkine, Bharat Biotech to set up COVID vax plant in city

SANJAY JOG
Mumbai




In a major development, Haffkine Pharmaceuticals Corporation and Hyderabad-based Bharat Biotech will jointly produce COVID-19 drug COVAXIN with the establishment of a new plant on the Parel premises in south central Mumbai at a cost of Rs 154 crore.

Chief Minister Uddhav Thackeray, who on Saturday visited Haffkine, said it can start vaccine production after technology transfer under the guidance of the ICMR from Parel and Pimpri facilities or it can work on fill and finish basis. CONTD. ON P8

NATION
www.freepressjournal.in MUMBAI | SUNDAY | MARCH 21, 2021

## Haffkine, Bharat Biotech to set up COVID...

Free Press Journal reported two days ago that the state government has taken up the issue with the Centre to allow Haffkine to start production. Under the fill and finish method, 1.26 crore vaccines can be supplied. Under this formula, Bharat Biotech will supply vaccines which will be filled up and packaged for supply by the Haffkine Bio Pharma Corp. Haffkine can produce 130 crore vaccines between April 1, 2021 and March 2022. Thackeray assured the state government's assistance to Haffkine in COVID -19 vaccine production. "For early availability of vaccine, work should be started keeping in view the availability of the Haffkine's production facilities at Paral and Pimpri. The production and supply of vaccines should be increased along with the annual production capacity of the Haffkine's polio vaccine production," said Thackeray. At present, preliminary talks should be held with vaccine manufacturers other than Bharat Biotech. Thackeray said.

---

सामना • मुंबई, शुक्रवार, १९ मार्च २०२१

# 'हाफकिन' दर महिन्याला एक कोटी लस पुरवणार
### व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड यांचा दावा

**। राजेश चुरी ।**

सामना मुलाखत

मुंबई, दि. १९ – प्लेगपासून जागतिक दर्जाच्या पोलिओ लसी, सर्पदंश, विंचूदंश, घटसर्पावर वर्षानुवर्षांपासून अतिशय प्रभावी लसींची निर्मिती तयार करणाऱ्या परळच्या हाफकिन बायो फार्मास्युटिकल कंपनीने कोविड लस तयार करण्याची संपूर्ण तयारी केली आहे. दर महिन्याला एक कोटी कोविड लसींच्या उत्पादनाची हाफकिनची क्षमता आहे असे हाफकिन बायो फार्मास्युटिकल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड यांनी सांगितले.

हाफकिन बायो फार्मास्युटिकलला कोविड लसीच्या उत्पादनाची मान्यता द्या अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बुधवारी केली. या पार्श्वभूमीवर हाफकिन बायो फार्माचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड यांनी हाफकिन कोविड लसींचे उत्पादन करण्यास सज्ज असल्याचे सांगितले. ▮ पान ८



### भविष्यातील विषाणूंशी लढण्यासाठी

भविष्यात हाफकिनच्या प्लॅण्टमध्ये केवळ कोविडच नव्हे तर कोणत्याही प्रकारची लस तयार करता येईल. दोन वर्षांनंतर कोरोना गेला तरी भविष्यात इतर विषाणूंचा हल्ला होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या विषाणूंचा हल्ला परतवून लावण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या लसींचे उत्पादन करावे लागणार आहे. आता प्लॅण्ट उभारला तर इतर कोणत्याही विषाणूंच्या विरोधात लढण्यासाठी लसी तयार करू शकू. राज्य सरकारने या प्रकल्पात गुंतवणूक केल्यास भविष्यात राज्य सरकारचा पथदर्शी प्रकल्प निर्माण होईल.

## गुजरात समाचार

ગુજરાત સમાચાર 3

મુંબઇ

### હાફકિનને રસી બનાવવા માટે રાજ્ય સરકાર તમામ સહાય કરશે : ઉદ્ધવ ઠાકરે

(પ્રતિનિધિ દ્વારા) મુંબઇ તા.૨૦

મુંબઇની ઐતિહાસિક હાફકિન ઇન્સ્ટીટ્યૂટને કોવિડની રસી તૈયાર કરવામાં રાજ્ય સરકાર તરફથી બનતી બધી જ મદદ કરવામાં આવશે એમ મુખ્ય પ્રધાન ઉદ્ધવ ઠાકરેએ આજે જણાવ્યું હતું.

#### મુખ્ય પ્રધાને પરેલમાં ઇન્સ્ટિટ્યુટની લીધી મુલાકાત

વડાપ્રધાન નરેન્દ્ર મોદીએ જ્યારે મુખ્ય પ્રધાનો સાથે વિડિયો કોન્ફરન્સ યોજી એ વખતે ઉદ્ધવ ઠાકરેએ હાફકિન સંસ્થાને કોવિડની રસી તૈયાર કરવાની મંજૂરી આપવાનો અનુરોધ કર્યો હતો. આનો સકારાત્મક પ્રતિસાદ મળ્યો હતો. એટલે ઠાકરેએ આજે પરેલ સ્થિત હાફકિન ઇન્સ્ટિટ્યૂટની મુલાકાત લીધી હતી અને રસી તૈયાર કરવાની સજ્જતા વિશે તાગ મેળવ્યો હતો.

મુખ્ય પ્રધાને મુલાકાત બાદ પત્રકારોને જણાવ્યું હતું કે કોરોનાને અંકુશમાં લેવા માટે રસીકરણને વેગ આપવાનું જરૂરી છે. બીજું મુંબઇમાં જ વેક્સિન તૈયાર કરવાનું માળખુ હાફકિનમાં ઉપલબ્ધ છે એટલે તેનો ઉપયોગ કરવાનો નિર્ણય લેવામાં આવ્યો છે.



હાફકિનમાં સીએમ : મહારાષ્ટ્રના મુખ્ય પ્રધાન ઉદ્ધવ ઠાકરેએ શનિવારે પરેલની હાફકિન ઇન્સ્ટિટ્યૂટની મુલાકાત લીધી હતી અને રસી તૈયાર કરવાને લગતી જાણકારી મેળવી હતી.

## नवभारत

मुंबई, रविवार 21 मार्च 2021 3

### हाफकिन करे वैक्सीन उत्पादन को लीड

**संस्थान के दौरे के दौरान बोले मुख्यमंत्री ठाकरे**

नवभारत न्यूज नेटवर्क

**मुंबई.** हाफकिन इंस्टीट्यूट को वैक्सीन अनुसंधान का लंबा अनुभव है, ऐसे में इस संस्थान को कोविड वैक्सीन उत्पादन को लीड करना चाहिए. यह बात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ने परेल में हाफकिन संस्थान के दौरे पर कही. उन्होंने कहा कि राज्य सरकार कोविड पर प्रतिबंध लगाने की पूरी कोशिश कर रही है. मुख्यमंत्री ने कहा कि पिछले साल की तरह बीमारी के प्रसार को रोकने के लिए बहुत सख्त उपाय किए जा रहे हैं.



उन्होंने कहा कि हाफकिन कॉरपोरेशन द्वारा वैक्सीन और दवाओं के निर्माण का काम निकट भविष्य में हाफकिन कॉरपोरेशन को दिया जाना चाहिए. मुख्यमंत्री ने कहा कि हैदराबाद की हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन और भारत बायोटेक संयुक्त रूप से 154 करोड़ रुपए की लागत से मुंबई में कोविड वैक्सीन उत्पादन की योजना बनाई है.

#### केंद्र सरकार से ले मदद

हाफकिन संस्थान कोविड टीका उत्पादन के माध्यम से महत्वपूर्ण योगदान दे सकता है. हाफकिन संस्थान को अपना 'बायोमेडिकल रिसर्च सेंटर' स्थापित करने के लिए केंद्र सरकार की मदद लेनी चाहिए.

- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

#### कोविड वैक्सीन उत्पादन की जल्द मिले अनुमति

उन्होंने कहा कि देश के कुछ राज्यों में बढ़ते कोरोना संक्रमण के कारण टीकाकरण में तेजी लाने की जरूरत है, जिसके लिए हाफकिन को वैक्सीन निर्माण की मंजूरी देने की आवश्यकता है. ठाकरे ने इस बारे में केंद्र सरकार से तत्काल कार्रवाई करने की मांग की है.





Mumbai Edition
21-march-2021 Page No. 5
epaper.enavabharat.com

## आपलं महानगर

• मुंबई, रविवार, २१ मार्च २०२१

### मुंबईतच तयार होणार कोरोना लस!

**मुख्यमंत्र्यांचा पाहणी दौरा, पुढाकारासाठी केल्या सूचना**

#### हाफकिनमध्ये उभारणार १५४ कोटींचा प्रकल्प

◆विशेष प्रतिनिधी : मुंबई

हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कोविड लसीचे उत्पादन करण्यात येणार असून त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन प्रकल्प मुंबईत सुरू करण्यात येत आहे. राज्यातील वाढत्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी हाफकिनला भेट देऊन औषध निर्माण करण्याबरोबर या संस्थेने आता कोविड लस निर्मितीसाठी आपला सर्व अनुभव पणास लावावा, यासाठी आयसीएमआर तसेच भारत बायोटेकची मदत घ्यावी. या मदतीसाठी राज्य सरकार पुढाकार घेईल, पण आता थांबू नये, अशी सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

पान २

#### हापकिनची लस निर्मिती पहिल्या टप्प्यात

भारत बायोटेक यांच्याकडील लस ठोक स्वरुपात घेण्यात येणार असून ती हाफकिन बायो फार्मासटीकल कॉर्पोरेशनमार्फत रिपॅकिंग व फिलिंग करून आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येईल. सध्या या लसीचे उत्पादन भारत बायोटेक आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांच्यामार्फत संयुक्तपणे केले जाते. कोवॅक्सिन या नावाने ही लस सध्या बाजारात आणली आहे. हाफकिन बायो फार्मासटीकल कॉर्पोरेशनमार्फत कोविड लसीची गरज असेल तोपर्यंत हे उत्पादन सुरू ठेवण्यात येईल आणि त्यानंतर या प्रकल्पामधून श्वान दंशावरील लस विकसित करून या लसीचे उत्पादन घेण्यात येईल किंवा वेळीवेळी लागणाऱ्या अन्य लसींच्या उत्पादनासाठी या प्रकल्पाचा उपयोग करण्यात येईल.



Mumbai Edition
Mar 21, 2021 Page No.
Powered by : eReleGo.com

## रविवार महाराष्ट्र टाइम्स

www.maharashtratimes.com

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

### लसीकरणाला वेग देणार

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

लस संशोधनाचा वारसा असणाऱ्या हाफकिन संस्थेने यापुढील काळात वेगवेगळ्या आजारांवरील लसींबाबत संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक आहे. सध्याची राज्यातील परिस्थिती पाहता कोविड लस उत्पादनामध्ये हाफकिन इन्स्टिट्यूटने पुढाकार घ्यावा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केल्या.

मुख्यमंत्र्यांनी शनिवारी परळ येथील हाफकिन इन्स्टिट्यूटला भेट दिली व प्रयोगशाळेची पाहणी केली. त्यानंतर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशीष कुमार सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव आबासाहेब जऱ्हाड, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड, हाफकिन इन्स्टिट्यूटच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. उषा पद्मनाभन यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची माहिती**

'गेल्या वर्षीप्रमाणे आताही संसर्गाला रोखण्यासाठी सरकार काटेकोर पाऊले उचलत आहे. येत्या काही दिवसांत राज्यात लसीकरणावर भर देण्यात येणार आहे. याकरिता हाफकिनला लस उत्पादन करण्याची मान्यता मिळणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारकडे याबाबत तातडीने पाठपुरावा करण्यात यावा. उत्कृष्ट दर्जाची लसनिर्मिती व पुरवठा करण्यावर भर द्यावा. येत्या काळात हाफकिनने कोविड लसनिर्मितीसाठी आयसीएमआर/भारत बायोटेक लिमिटेडकडून तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणासाठी प्रयत्न करावेत', असे मुख्यमंत्री ठाकरे यांनी बैठकीत सांगितले. येत्या काळात हाफकिन संस्थेचे स्वतःचे असे 'जैव वैद्यकीय संशोधन केंद्र' स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारची मदत घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.



#### १३० कोटी लस क्षमता

हाफकिनमध्ये कालमर्यादित प्रयोगशाळा उभारण्यासाठी उपलब्ध असणारी जमीन, लस तयार करण्यासाठी आवश्यक असणारा खर्च, तज्ज्ञ मनुष्यबळाची तरतूद या सगळ्या बाबी तपासून घ्याव्यात. हाफकिनमार्फत एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत अंदाजे १३० कोटी लस निर्माण करण्याची क्षमता आहे. सध्या भारत बायोटेकशिवाय इतर लस तयार करणाऱ्या उत्पादकांबरोबरही प्राथमिक बोलणी करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

## सामना

• मुंबई, शुक्रवार, १९ मार्च २०२१

८ विविध

### 'हाफकिन' दर महिन्याला एक कोटी लस पुरवणार

*(पान १ वरून)* यापूर्वीची हाफकिनची कामगिरी, पोलिओ लसींचे युनिसेफने केलेले कौतुक, कोविड लसीच्या उत्पादनाची योजना अशा विविध विषयांवर डॉ. राठोड यांनी संवाद साधला.

#### राज्य सरकारचीच कंपनी

हाफकिन ही राज्य सरकारचीच कंपनी आहे. त्यामुळे कोविड लसनिर्मितीचा मुंबईत नवीन प्लॅण्ट उभारण्याकरिता हाफकिनने राज्य सरकारकडे १५४ कोटी रुपये मागितले आहेत. लसीच्या क्षेत्रात काम करणारी राज्य सरकारची ही एकमेव संस्था आहे. त्यामुळे आता यामध्ये गुंतवणूक केल्यास भविष्यात फायदा होईल. कोरोना अजून पुढील काही वर्षे राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे लसींचा पुरवठा करावाच लागेल. आपण लसींच्या उत्पादनासाठी नवीन प्लॅण्ट उभारला तर खर्च वाया जाणार नाही.

#### ▌दरवर्षाला बारा कोटी कोविड लसी

कोविड लसींच्या उत्पादनासाठी हाफकिनचा परळ व पुण्यातील पिंपरीच्या प्लॅण्टचा वापर करण्याची योजना आहे. भारत बायोटेक व आयसीएमआरने लसीचा कच्चा माल दिला तर लसी तयार करता येतील. कारण आयसीएमआर व भारत बायोटेकच्या संयुक्त विद्यमाने ही लस तयार झाली आहे. ही लस कुप्यांमध्ये भरून येत्या एक ते दोन महिन्यांत कोविड लस बाजारात आणता येईल. लसीचा कच्चा माल पुरेशा प्रमाणात मिळाला तर वर्षाला अंदाजे बारा कोटी लसी बाजारात आणता येतील. सर्वसाधारणपणे महिन्याला एक कोटी म्हणजे दरवर्षाला बारा कोटी कोविड लसी बाजारात आणणे शक्य होईल.

#### हाफकिनची विश्वासार्हता

हाफकिनने आतापर्यंत प्लेग, पोलिओ, सर्पदंश, धनुर्वातावर लसी तयार केल्या आहेत. या लसी सिद्धही झाल्या आहेत. 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर हाफकिन काम करीत आहेत. अत्यंत दर्जेदार व गुणवत्तापूर्वक लसी तयार होतात. हाफकिनची आतापर्यंत जी उत्पादने तयार झाली आहेत त्याची दखल जगाने घेतली आहे. हिंदुस्थानातून देशातून पोलिओचे संपूर्ण उच्चाटन झाले त्यावेळी युनिसेफच्या संचालिका शॅनल हॉल यांनीही हाफकिनचे कौतुक केले आहे. ६० वर्षे हाफकिनमध्ये पोलिओ लसींचे उत्पादन सुरू आहे.

#### ▌कोविड सुरक्षा योजनेअंतर्गत प्रस्ताव

केंद्र सरकारच्या कोविड सुरक्षा योजनेअंतर्गत लसनिर्मितीसाठी हाफकीनने केंद्र सरकारकडे यापूर्वीच केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर केला आहे. कारण ज्या कंपन्या कोविड लस तयार करण्यास इच्छुक आहेत अशा कंपन्यांकडून केंद्राने प्रस्ताव मागवले होते. त्या योजनेअंतर्गत लस उत्पादनाचा प्रस्ताव हाफकिनने दिला होता. यासाठी केंद्राच्या विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून निधी दिला जातो.

#### १५ कोटी पोलिओ लसींची निर्मिती

हाफकिनमध्ये सध्या दरवर्षाला सुमारे १५ कोटी पोलिओ लसींचे उत्पादन होते. या उत्पादनावर कोणताही परिणाम न होता कोविड लसींचे उत्पादन घेता येईल.

## THE TIMES OF INDIA

### Haffkine inks MoU with Bharat Biotech to produce Covaxin

Times News Network

**Mumbai:** With Parel-based Haffkine Bio-Pharmaceutical Corporation Ltd signing the memorandum of understanding with Hyderabad's Bharat Biotech to manufacture Covaxin last week, state officials said they are hopeful of rolling out the first batches of the Covid-19 vaccine in eight to 10 months.

Saurabh Vijay, secretary, medical education and drugs department said the MOU will pave the way for technology transfer and several other steps in the vaccine manufacturing process. The science and technology ministry had said last week things have been set in motion for technology transfer that will allow Haffkine Biopharma to produce 22.8 crore doses of Covaxin in a year. "We are hoping to start production in eight months. Priority will be to build the biosafety level-III facility in Parel," Vijay said, adding that Haffkine was also seeking the help of IIT-Bombay, TIFR and ICT in Matunga to build a strong technical team.

Haffkine has been given a grant of Rs 65crore by the Centre and Rs 94 crore by the state for Covaxin production. Vijay said teams would travel to Hyderabad to get trained, while experts from Hyderabad and the department of biotechnology will also handhold the institute. Haffkine BioPharmaceutical is an offshoot of the 122-year-old Haffkine Institute, one of the oldest biomedical research institutes in the country. The Centre has said the current production capacity of indigenously developed Covaxin vaccine will be increased nearly six-fold by July-August 2021.





Rollout is likely in 8-10 months

## मुंबई चौफेर

05

मुंबई
शुक्रवार, ७ मे २०२१

### को-व्हॅक्सिन लस निर्मितीला हाफकीन कर्मचारी सर्वतोपरी सहकार्य करतील

**शिवसेना उपनेते सचिन अहिर यांचे आश्वासन**

मुंबई- राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुढाकार घेतल्यामुळे मुंबईतील हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळला अलीकडेच केंद्र सरकारने को-व्हॅक्सिन लस उत्पादित करण्यास मान्यता दिली. या पार्श्वभूमीवर हाफकीन बायो फार्मा कार्पोरेशन एम्प्लॉइज युनियनचे मुख्य मार्गदर्शक, शिवसेना उपनेते आणि माजी राज्यमंत्री सचिनभाऊ अहिर यांनी गुरुवारी महामंडळाचे संचालक डॉ. संदीप राठोड यांची भेट घेतली. कोरोना काळातील या महत्त्वपूर्ण यशाचे श्रेय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आहे. असे सांगून या कामाबद्दल संचालक डॉ. संदीप राठोड यांना सुयश चिंतून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. युनियनचे अध्यक्ष गोविंदराव मोहिते यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. परेल येथील हाफकीन महामंडळाला भेट दिली तेव्हा युनियनचे नितीन तिर्लोटकर, विदेश पेडणेकर, दीपक पेडणेकर, सुधीर सावंत, विनया नार्वेकर, विलास होडगे, विवेक जाधव हे पदाधिकारी उपस्थित होते. महामंडळाचे संचालक डॉ. संदीप राठोड यांना को-व्हॅक्सिन उत्पादन करण्याकामी कर्मचारीवर्ग संपूर्ण सहकार्य करील, असे आश्वासनही सचिनभाऊ अहिर यांनी याप्रसंगी दिले.



सकाळ
पुणे, गुरुवार, २२ जुलै २०२१ ९

# हाफकीन, 'एचए'ला मदत करावी

## शरद पवार : राज्यसभेत केंद्र सरकारला सूचना

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. २१ : सध्या कोरोना लसनिर्मिती करणाऱ्या सीरम इन्स्टिट्यूट आणि भारत बायोटेक या दोन प्रमुख कंपन्या देशात आहेत. मात्र हिंदुस्तान ॲंटिबायोटिक्स (एचए) आणि महाराष्ट्र राज्य सरकार संचलित हाफकीन इन्स्टिट्यूट या कंपन्याही लसनिर्मितीची जबाबदारी घेण्यास तयार आहेत. केंद्र सरकारने त्यांना आर्थिक मदत करावी, अशी सूचना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राज्यसभेत बोलताना केंद्र सरकारला केली.



शरद पवार यांनी केलेल्या दुसऱ्या सूचनेनुसार, कोरोनाकाळात देशातील बहुतांश शाळा बंद आहेत. शहरी भागांत ऑनलाइन शिक्षणाची सुविधा आहे. मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे पुरेसे मोबाईल व डिजिटल सुविधा नाहीत. केंद्र सरकार त्यांना आर्थिक मदत करून ऑनलाइन शिक्षणाचा प्रसार करेल काय, असा प्रश्न उपस्थित केला. या विद्यार्थ्यांना मोबाईलची उपलब्धता करून द्यावी किंवा त्यासाठी आर्थिक मदत करावी, अशीही सूचना पवार यांनी केली.

पवार यांच्या प्रश्नांच्या उत्तरात आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया म्हणाले, की हाफकीनला केंद्राने लस निर्मितीला यापूर्वीच परवानगी दिली असून त्यांना सहकार्यही केले आहे.

Pune, Main
22/07/2021 Page No. 9




ABP माझा 17 Mar 2021 . 5:00 PM

# राज्यात हाफकिन लस उत्पादन करणार, मुख्यमंत्र्यांच्या विनंतीला पंतप्रधानांचा हिरवा कंदील



मुंबई : राज्यात हाफकिनला कोरोना लस उत्पादन करण्याची मान्यता मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशभरात सर्व राज्यांमध्ये लस उत्पादन करू शकणाऱ्या संस्थांना पाठबळ व प्रोत्साहन देण्यात येईल असे जाहीर केलंय. राज्यात कोरोनाने पुन्हा एकदा डोकं वर काढलं असून रोजचा आकडा 17 हजारांच्या पार गेला आहे. या वाढत्या कोविड संसर्गाच्या अनुषंगाने पंतप्रधान मोदी यांनी काही राज्यातील मुख्यमंत्र्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ही मागणी केली होती.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अधिकाधिक लसीकरण केंद्रांना परवानगी मिळावी जेणेकरून लसीकरणाचा वेग वाढवता येईल तसेच हाफकिनला लस उत्पादन करण्याची मान्यता मिळावी अशी विनंती या बैठकीत केली होती. विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांची सूचना लगेचच उचलून धरत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशभरात सर्व राज्यांमध्ये लस उत्पादन करू शकणाऱ्या संस्थांना पाठबळ व प्रोत्साहन देण्यात येईल असे जाहीर केले.

कोविड लसीचे हाफकिनकडून उत्पादन होणार

कोविड लसीचे हाफकिनकडून उत्पादन करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांना विनंती केली. हाफकिन बायो फार्मासिटीकल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना मिशन कोवीड सुरक्षेअंतर्गत लसीची टेक्नॉलॉजी हस्तांतरण करण्यासाठी आयसीएमआरच्या मार्गदर्शनाने परवानगी मिळावी जेणेकरून लस प्रत्यक्ष उत्पादित करता येईल किंवा फील- फिनिश (Fill & Finish) बेसिसवर हाफकीनला काम करता येईल, यामधून 126 दशलक्ष कोविड लसी हाफकिनमार्फत उत्पादित होऊ शकतात असे मुख्यमंत्री म्हणाले. यावर पंतप्रधानांनी देशात सर्वच राज्यांत अशा प्रकारे लस उत्पादनात पुढाकार घेणाऱ्या उद्योग व संस्थांना प्रोत्साहन देण्याचे आणि त्यांची क्षमता 24X7 पूर्णपणे कशी वापरता येईल ते पाहण्याचे बैठकीत जाहीर केले.

दररोज 3 लाखांपर्यंत लसीकरण करण्याचा प्रयत्न

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले की , लसीकरणासाठी ज्या केंद्रांची तयारी व क्षमता आहे अशा केंद्रांना किंवा रुग्णालयांना लसीकरणासाठी परवानगी मिळावी. लसीकरणासाठी महाराष्ट्रात देखील अनेक खासगी रुग्णालयांनी नोंदणी केली आहे पण त्यापैकी किती जणांची प्रत्यक्ष तयारी आहे हे तपासून लसीकरण वाढविण्यात येईल. दररोज 3 लाखांपर्यंत लसीकरण व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

आरटीपीसीआर चाचणीबाबतही समाधान

राज्याने आरटीपीसीआर चाचण्या मोठ्या प्रमाणावर करण्यास सुरुवात केली असून एकूण चाचण्यांपैकी 70 टक्के चाचण्या या पद्धतीने केल्या जातात, हे प्रमाण देखील इतर राज्यांच्या तुलनेत समाधानकारक आहे असे आजच्या बैठकीत केंद्रीय आरोग्य सचिवांनी सांगितले.

45 वयापुढील सर्वांना लस देण्याची विनंती

पंतप्रधानांनी यावर जगातल्या कानाकोपऱ्यातील सर्वच देशांत वैज्ञानिक यासंदर्भात बारकाईने लक्ष ठेवून असून या बदलाचा अभ्यास करीत आहेत असे उत्तर दिले. लसीचे दोन डोस घेतल्यावरही विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर कोरोना झाल्याच्या काही घटना मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांच्या निदर्शनास आणल्या तसेच राज्यात पुढील काळात आम्ही मोठ्या प्रमाणावर लसीकरण आणि त्याजोडीनेच मास्क वापरत राहणे, सुरक्षित अंतर ठेवणे या आरोग्याच्या नियमांवर जास्तीत जास्त भर देणार आहोत असेही मुख्यमंत्री म्हणाले. बाधितांमध्ये तरुण गट पण आहे हे लक्षात घेऊन 45 वर्षे वयोगटापासून पुढे सहव्याधी असो किंवा नसो, सर्वांना लसीकरण करावे अशी मागणीही मुख्यमंत्र्यांनी केली.




सकाळ
मुंबई, रविवार, १८ एप्रिल २०२१

# 'हाफकिन'ची लस बदलत्या कोरोनावर उपयुक्त : डॉ. शिंगणे

## सर्वोत्तम लस निर्मितीची ग्वाही; जागतिक दर्जा मिळवून देण्यासाठी राज्य सरकारचे पाठबळ

दीपा कदम : सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १७ : हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये तयार होणारी कोरोनावरची लस 'नेक्स्ट जनरेशन' म्हणजे बदलत्या कोरोनावर उपयोगी ठरणारी असेल,'' असा दावा अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी केला. कोरोनाचे झपाट्याने बदलते स्वरूप पाहता कोरोनावरील लस निर्मिती करताना या आजाराचे स्वरूप किती पटींनी बदलू शकते याचा अंदाज घेऊन 'हाफकिन'मध्ये लस निर्माण केली जाणार असल्याची माहिती डॉ. शिंगणे यांनी दिली.

हाफकिनला संशोधन आणि औषध निर्मितीमध्ये पुन्हा एकदा जागतिक दर्जा मिळवून देण्यासाठी राज्य सरकारचे पाठबळ महामंडळाच्या मागे उभे केले जाणार असल्याचे सूतोवाचही डॉ. शिंगणे यांनी केले.


'हाफकिन'मध्ये कोरोनाची लस निर्मिती करण्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. यावेळी लस निर्माण करण्यास उशीर झाला असल्याची कबुलीही त्यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली. मागचे काही महिने आम्ही केंद्र सरकारकडे यासाठी प्रयत्न केला होता, त्यावेळी परवानगी मिळाली नव्हती. तहान लागल्यावर विहीर खणण्यासारखाच हा प्रकार आहे, मात्र आम्ही जगातील सर्वोत्तम लस निर्माण करून ही कसर भरून काढू.

कोरोनाचे बदलते स्वरूप ध्यानात घेऊन यापुढे आपल्याला जावे लागेल असेही ते म्हणाले. यापुढे 'हाफकिन'मध्ये संशोधनावर भर देणार आहे. संशोधक भविष्यात विषाणूंच्या आजाराच्या धोक्याना इशारा देत आहेत. त्याविषयीचे संशोधन 'हाफकिन इन्स्टिट्यूट'मध्ये सुरू केले जाणार आहे. हाफकीन इन्स्टिट्यूटने लसनिर्मितीतला आपला ठसा कायम ठेवला आहे. 'हाफकिन'च्या आधारे औषध आणि लस निर्माण करण्याच्या बाबतीतही राज्याने आत्मनिर्भर व्हावे, यासाठी संशोधनावर भर दिला जाईल, असेही डॉ. शिंगणे यांनी सांगितले.



> खासगी यंत्रणेचा उपयोग होतो पण शासकीय यंत्रणा सक्षमपणे आणि जबाबदारीने काम करते. त्यामुळे सरकारी रुग्णालय, 'हाफकिन'सारख्या संशोधन संस्थांना सरकारने कायम पाठबळ दिले पाहिजे.
> - डॉ. राजेंद्र शिंगणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री

Mumbai, Main
18/04/2021 Page No. 2




मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !
WWW.LOKSATTA.COM
मुंबई, गुरुवार, १८ मार्च २०२१ ★ ३

# 'हाफकिन बायोफार्मा'मार्फत करोना लस उत्पादन

## वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांची घोषणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत करोना लशीचे उत्पादन करण्यात येणार असून त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन प्रकल्प मुंबईत सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांनी बुधवारी दिली.

करोना लशींच्या उत्पादनासाठी लस संशोधनाचा वारसा असणाऱ्या हाफकिन संस्थेने पुढे यावे, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अलीकडे केले होते. यानुसार या संदर्भात बुधवारी मंत्रालयात घेण्यात आलेल्या बैठकीत अमित देशमुख बोलत होते.

हाफकिनमार्फत सुरू करण्यात येणाऱ्या लशींचे उत्पादन दोन टप्प्यांत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात भारत बायोटेक यांच्याकडील लस ठोक स्वरूपात घेण्यात येणार असून ती



हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशनमार्फत पुनर्वेष्टीत करून आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येईल. सध्या या लशीचे उत्पादन भारत बायोटेक आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांच्यामार्फत संयुक्तपणे केले जाते. 'कोव्हॅक्सिन' या नावाने ही लस सध्या बाजारात आणली आहे. 'हाफकिन'ला ही लस लवकर मिळाल्यास येत्या एप्रिल किंवा मेपासून हाफकिनमार्फत ही लस उपलब्ध केली जाईल. तर स्वतंत्रपणे करोना लशीचे उत्पादन करण्यासाठी 'हाफकिन'ला एक ते दीड वर्षाचा कालावधी लागेल. हाफकिनमार्फत लशीची गरज असेल तोपर्यंत हे उत्पादन सुरू ठेवण्यात येईल.

भारत बायोटेककडून मोठ्या प्रमाणात करोना लस पुरविण्यासंदर्भात केंद्र शासनाला सविस्तर प्रस्ताव तातडीने पाठविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशनमार्फत नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी आवश्यक निधीची मागणी करण्यात येणार आहे, अशी माहितीही अमित देशमुख यांनी दिली आहे.

www.navshakti.co.in
जनसामान्यांची महाशक्ती
नवशक्ति
मुंबई ८७ वर्ष १२० अंक गुरुवार, १८ मार्च २०२१ पाने : १८



# हाफकिन संस्थेला लसनिर्मितीची परवानगी

## मुख्यमंत्र्यांची विनंती पंतप्रधानांकडून मान्य

विशेष प्रतिनिधी/मुंबई

लस संशोधन आणि निर्मितीत अग्रगण्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हाफकिनला कोरोना प्रतिबंधक लस उत्पादन करण्याची परवानगी मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुधवारी तशी विनंती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली. ही विनंती मान्य करत मोदी यांनी संपूर्ण देशभरात सर्व राज्यांमध्ये लस उत्पादन करू शकणाऱ्या संस्थांना पाठबळ आणि प्रोत्साहन देण्याचे जाहीर केले.

मोदी यांनी आज कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाबाबत देशभरातील मुख्यमंत्र्यांची दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी महत्वाच्या मुद्द्यांवर लक्ष वेधले. या बैठकीत ठाकरे यांनी कोरोना प्रतिबंधित लसीचे हाफकिनकडून उत्पादन करण्याबाबत पंतप्रधानांना विनंती केली. यामधून १२६ दशलक्ष कोविड लसी हाफकिनमार्फत उत्पादित होऊ शकतात, अशी माहिती ठाकरे यांनी दिली. यावर पंतप्रधानांनी देशात सर्वच राज्यांत अशा प्रकारे लस उत्पादनात पुढाकार घेणाऱ्या उद्योग आणि संस्थांना प्रोत्साहन देण्याचे आणि त्यांची क्षमता पूर्णपणे कशी वापरता येईल ते पाहण्याचे बैठकीत जाहीर केले.

### कोरोनाची दुसरी लाट रोखायला हवी - मोदी



आपल्याला भीतीचे वातावरण निर्माण करायचे नाही. मात्र, काही दक्षता बाळगून काही बाबतीत पुढाकार घेऊन आपल्याला जनतेला संकटातून बाहेरदेखील काढायचे आहे. आपल्या जुन्या प्रयत्नांना समाविष्ट करून आपल्याला नवे धोरण आखावे लागणार आहे. प्रत्येक राज्याचे विविध प्रयोग आहेत व चांगले प्रयोग आहेत. अनेक राज्य अन्य राज्यांकडून नवनवीन प्रयोग शिकत आहेत. आता आपल्याला सक्रिय होण्याची आवश्यकता असून कोरोनाची दुसरी लाट तात्काळ रोखायला हवी, अशी सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना केली. जिथे आवश्यक आहे तेथे मायक्रो कंटेन्मेंट झोन बनवण्याच्या पर्यायाचा वापर करण्यात कोणत्याही परिस्थितीत हयगय होता कामा नये. यावर काम झाले पाहिजे. याशिवाय कोरोना लस वाया जाण्याचे प्रकार थांबवावे, असेही यावेळी मोदींनी सांगितले.

### ४५ वयापुढील सर्वांना लस देण्याची मागणी

**सध्या कोरोना बाधितांमध्ये तरुण गट अधिक आहे. हे लक्षात घेऊन ४५ वर्षे वयोगटापासून पुढे सहव्याधी असो किंवा नसो सर्वांना लसीकरण करावे, अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधानांकडे केली.**

### हाफकिन कोविड लस निर्मिती करणार - अमित देशमुख

हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन आणि हैदराबाद येथील भारत बायोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत कोविड लसीचे उत्पादन करण्यात येणार असून त्यासाठी १५४ कोटी रुपये खर्चाचा नवीन प्लांट मुंबईत सुरु करण्यात येणार आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांनी आज दिली. कोविड लसीच्या उत्पादनासाठी लस संशोधनाचा वारसा असणाऱ्या हाफकिन संस्थेने पुढे यावे, असे आवाहन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी अलिकडे केले होते. यानुसार आज वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव विजय सौरभ, हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशनचे संचालक संदीप राठोड, जनरल मॅनेजर सुभाष शंकरवार यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात घेण्यात आलेल्या बैठकीत अमित देशमुख बोलत होते.









पब्लिक वायफाय चा वापर करून कधीही ऑनलाईन बँकींग व्यवहार करु नका.


# ध्वजवंदन





२६ जानेवारी २०२१















२६ जानेवारी २०२१ या प्रजासत्ताक दिनी हाफकिन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संदीप राठोड (भा.प्र.से.) यांच्या हस्ते परळ, मुंबई विभागामध्ये ध्वजारोहण करण्यात आले. आणि १५ ऑगस्ट २०२१ या स्वातंत्र्य दिनी महामंडळातील जेष्ठतम कर्मचारी श्री. तुकाराम गुरव, उत्पादन सहाय्यक वर्ग 'क' यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रतिविष व रक्तजल पिंपरी विभाग येथे व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब कुऱ्हे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आणि हाफकिन अजिंठा फार्मा. लिमिटेड जळगाव विभाग येथे श्री. नितिन निलकंठ पाठक, प्रभारी गुणवत्ता नियंत्रण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



मुद्रण : संजय प्रिन्टर्स - ९८१९६१४४७५

आपल्या बँकेच्या व युपीआई अकाऊंटच्या सुरक्षिततेकरिता नजीकच्या बँकेत व पेटीएम/फोन पे सेवा केंद्र या युपीआय केंद्रात प्रत्यक्ष जावून केवायसी करून घ्यावी.